नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९८ * * अकोला * | मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हिमाचलमध्ये २३ ला बर्फवृष्टीचा इशारा

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. १९ :
हिमाचल प्रदेशमध्ये 22 जानेवारीला तीव्र वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय होईल. हे लक्षात घेऊन, हवामान विभागाने 23 जानेवारी रोजी काही उंच प्रदेशात जोरदार बर्फवृष्टीसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. लाहौल स्पीती, किन्नौर, चंबा, कुल्लू आणि शिमला जिल्ह्याच्या काही भागांमध्ये चांगल्या बर्फवृष्टीची शक्यता आहे.

24 जानेवारी रोजीही संपूर्ण राज्यात पाऊस-बर्फवृष्टी होईल. यामुळे तापमानात घट होईल. तथापि, सध्या अनेक शहरांमध्ये किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त आहे. मैदानी प्रदेशात थंडीच्या लाटेमुळे रात्री थंड आहेत, पण शिमला, कुफरी, नारकंडा येथे रात्रीचे तापमान जास्त आहे.

## संदीपजींच्या वाटा आणि वळणे

अग्रलेख
खरीखरी..
श्रीकृष्ण चांडक



राजकारणात ५५ व्या वर्षी राजकीय माणूस तरणाताठा असतो. नागपूर शहराचे माजी महापौर संदीप जोशी यांचा सक्रिय राजकारणातील राजीनामा हेच आजचे अजब आहे. संदीपजी नागपुरात अनेक वर्षांपासून सेवा, समर्पण आणि शिस्त याचे उदाहरण आहेत. त्यांच्या ५५ वर्षांच्या काळातील अनेक छोट्या-मोठ्या घटनांचे आणि घडलेल्या प्रसंगाचे साक्षीदार नागपुरात हजारोंनी सापडतील. महापौर पदावर असताना त्यांनी शहराची सेवा करण्यात कोणतीही कसूर केली नाही. रुग्णांच्या नातेवाईकांना अत्यल्प दरात भोजन सुविधा प्रदान करण्याचे त्यांचे महत्त्कार्य आपण सर्वांनीच पाहिलेले आहे. नागपूर शहरातील दोन दिग्गज नेते ते म्हणजे नितीनजी गडकरी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत निकटचे मानले गेलेले संदीप जोशी सक्रिय राजकारणातून राजीनामा देत आहेत, हे खरे असले तरी मनाला पटत नाही. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री असताना देवेंद्रजींनी नागपूर शहरातील जनतेच्या कामाची परिपूर्ती करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली होती ती कामगिरी त्यांनी उत्तमरित्या पार पाडली. यावरूनच त्यांच्या एकूण कार्यक्षमतेविषयी त्यांच्यावर पक्ष नेतृत्वाचा किती विश्वास आहे हे दिसून येते. आज अचानक संदीप जोशी यांचा आलेला राजीनामा हा नाराजीनामा तर नाही ना, अशी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये कुजबूज आहे. तीच आशंका व्यक्त करून आमच्या परिचयातील काही कार्यकर्त्यांनी आम्हाला याबाबत विचारले. आजच्या राजकारणात आपला पक्ष देशभरात तेजाने तळपत असताना असा निर्णय घेण्याची कारणे निश्चितच जनतेला ठाऊक झालीच पाहिजेत. नागपूर मध्ये ज्या जागेवरून आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वडील आणि त्यांच्या अकाली निधनानंतर नितीनजी गडकरी आमदार म्हणून निवडून आले होते. त्या जागेवरील अत्यंत प्रतिष्ठेची निवडणूक लढण्यासाठी संदीप जोशी यांना पक्षाने तिकीट दिले होते. ती निवडणूक वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांना जिंकता आली नाही. खरे तर त्या पराभवाचे विजयात रूपांतर करण्याची वेळ आता आली होती असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यातच सध्या त्यांचे राजकारणातील तरुणपर्व सुरू असताना अचानक असा निवृत्तीचा निर्णय घेणे यामागे कौटुंबिक, आर्थिक किंवा सामाजिक जबाबदारीचे मोठे काम संदीप जोशी यांच्याकडे येत असावे असा अंदाज करण्यासही हरकत नाही. संदीप जोशी यांचा जनसंपर्क तसेच नियोजकतेबद्दल आणि कोणतेही काम यशस्वी करून दाखवण्याबद्दल त्यांची ख्याती आहे. पक्ष त्यांच्या विचारांशी सहमत आहे की नाही हे अजून तरी समजलेले नाही. समजा पक्षाला मोठी कामगिरी त्यांच्याकडे द्यायची असेल तर त्यांचे हे पाऊल प्रगतीच्या दिशेने जात असेल. कारण संदीप जोशी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एकनिष्ठ स्वयंसेवक आहेत. त्यामुळेच त्यांच्या राजीनाम्याशी संघाचाही संबंध असू शकतो. ते काहीही असले तरी एक तरुण, धडाकेबाज, स्पष्टवक्ता राजकारणी अचानक राजकारणाला जय श्रीराम करतो, हे नवल नसले तरी आश्चर्यजनक नक्कीच आहे. संदीपजींच्या आयुष्यातील मंगल दीपाकडील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

राज्यातील २९ मनपांतील महापौर पदाचे आरक्षण ठरवण्यासाठी

# गुरुवारी होणार सोडत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौर पदाच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वाची हालचाल सुरू झाली असून, या विषयावर तोडगा काढण्यासाठी आणि आरक्षण ठरवण्यासाठी नगरविकास विभागाकडून उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, ही बैठक 22 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता मंत्रालयात होणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान राज्याचे नगरविकास मंत्री भूषवणार आहेत.

शासनाच्या या पत्रानुसार, राज्यातील 29 महानगरपालिकांमध्ये महापौर पदासाठी आरक्षण निश्चित करण्याबाबत सध्या निर्माण झालेल्या पेचावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. मंत्रालयातील परिषद सभागृहात, सहाव्या मजल्यावर ही बैठक पार पडणार असून, त्यामध्ये संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. महापौर पदाचे आरक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तास्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या बैठकीत आरक्षण सोडत काय निघते, याकडे लक्ष लागले आहे.

नगरविकास विभागाच्या उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी हे पत्र जारी केले असून, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षण निश्चितीचा निर्णय नगरविकास मंत्र्यांच्या निर्देशानुसार घेतला जाणार आहे. या बैठकीत होणाऱ्या चर्चेनंतर महापौर पदाच्या आरक्षणाबाबत



अंतिम सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या महापालिका सत्तास्थापनेसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.

या पत्राची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच संबंधित वरिष्ठ सचिवांना देण्यात आली आहे. यावरून राज्य सरकार या विषयाकडे किती गांभीर्याने पाहत आहे, हे स्पष्ट होते. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर अनेक शहरांमध्ये महापौर पदाच्या आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद निर्माण झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

राज्यातील महापालिकांमध्ये सत्तास्थापना, महापौर निवड आणि पुढील प्रशासकीय निर्णय यासाठी आरक्षण निश्चित होणे आवश्यक असते. त्यामुळे या बैठकीतून निघणारा निर्णय केवळ प्रशासकीय नव्हे, तर राजकीय दृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार आहे. गुरुवारी होणाऱ्या या बैठकीकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

## मुंबईचा महापौर महायुतीचाच होणार!

उपमुख्यमंत्री शिंदेंची जाहीर कबुली



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :
मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून सध्या शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये चर्चा सुरू आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत मुंबईत महायुतीचाच महापौर होणार असल्याचे म्हटले आहे.

महापालिका निवडणुकीत मुंबईकरांनी महायुतीला पसंती दिली आहे, आम्ही जनमताचा आदर करणार. विरोधकांकडून अफवा पसरवण्यात येत असून त्यावर कोणीही विश्वास ठेवू नये, असे शिंदे म्हणाले. तसेच बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी मुंबईचा महापौर हा शिवसेनेचा असावा ही कार्यकर्त्यांची भावना असू शकते, असेही शिंदे म्हणाले.

शिंदे म्हणाले, 2019 साली जनमताचा अनादर करत ठाकरेंनी वेगळी सत्ता स्थापन केली. तसे आम्ही करणार नाही. आम्ही जनमताचा आदर करतो. बाळासाहेबांचा आशीर्वाद, नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुका लढल्या गेल्या. त्यानुसार ज्या ज्या ठिकाणी आम्ही महायुतीत लढलो त्या त्या ठिकाणी महायुतीचा महापौर निवडून येणार.

ठाण्यात अडीच वर्षांच्या महापौरपदाची चर्चा सुरू असल्याचे चर्चा आहे, यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, या विरोधकांनी पसरवलेल्या अफवा आहेत. आमची लढाई ही सत्ता खुर्चीसाठी नाही, आमची लढाई ही मुंबईच्या विकासासाठी आहे. मुंबईकरांना आम्ही काय देणार आहोत यावर आम्ही लक्ष दिले असल्याचे शिंदे म्हणाले.

नवनियुक्त नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे, यावर प्रश्न विचारला असता एकनाथ शिंदे म्हणाले, आमच्या पक्षाची बैठक घेतली, नव्याने निवडून आल्यानंतर त्यांना मार्गदर्शन केले. पुढच्या पाच वर्षात त्यांनी काय काम करायचे याबद्दल त्यांना मार्गदर्शन केल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

## शिवसेना आणि धनुष्यबाण कुणाचा?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आणि दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा पेच आता सर्वोच्च न्यायालयात सुटण्याच्या मार्गावर आहे.

**सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अंतिम सुनावणी**

शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाबाबत येत्या बुधवारपासून (२१ जानेवारी) अंतिम सुनावणीला सुरुवात होत आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस या प्रकरणाचा युक्तिवाद ऐकून घेणार असून, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल लवकरच जाहीर होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हावर देखील सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे.

आयोगाने संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्ह हे उद्धव ठाकरे यांच्याकडून काढून शिंदे यांच्या गटाला दिले. या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवण्याऐवजी पात्र ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयालाही शिवसेनेचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांनी आव्हान दिले असून, या दोन्ही याचिकांवर आता बुधवारी एकत्र सुनावणी होणार असल्याची माहिती आहे.

## नितीन नबीन भाजपचे १२वे राष्ट्रीय अध्यक्ष



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :
भाजपचे कार्यवाहक अध्यक्ष नितीन नबीन हे आता पक्षाचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष होतील. सोमवारी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात नामांकन प्रक्रिया पार पडली. राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी सांगितले की, या पदासाठी फक्त नितीन नबीन यांचे नाव प्रस्तावित करण्यात आले आहे.

त्यांनी सांगितले की, नितीन नबीन यांच्या समर्थनार्थ एकूण ३७ नामांकन पत्रे दाखल करण्यात आली होती. नामांकन पत्रांची छाननी करण्यात आली आणि सर्व वैध आढळले. नितीन यांचे नाव २० जानेवारी रोजी औपचारिकपणे जाहीर केले जाईल.

## ओबआ सोबत काँग्रेसची युती



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
काँग्रेसने आता आपला विस्तार वाढवण्यावर भर दिला असून, आगामी निवडणुकांसाठी मित्रपक्षांची मोट बांधण्यास सुरुवात केली आहे.

याच रणनीतीचा भाग म्हणून आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी काँग्रेसने आता 'ओबीसी बहुजन आघाडी'सोबत अधिकृतपणे युतीची घोषणा केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि ओबीसी नेते प्रकाश शेंडगे, चंद्रकांत बावकर व जे. डी. तांडेल यांच्यात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील हे ऑनलाईन उपस्थित होते. या नव्या समीकरणामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राजकीय चुरस अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म,
महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

दररोज वाचनीय - दै. महासागर
दै. महासागर हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर, समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत

सोमवार - कॅलिडोस्कोप
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

मंगळवार - जोश
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

बुधवार - निरामय
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

गुरुवार - अस्मिता
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

शुक्रवार - भक्ती मार्ग
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

शनिवार - बालांगण
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

रविवार - साहित्य मैफिल
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत श्रीकृष्ण चांडक यांचा 'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.

ई-पेपर - महासागर मीडिया ग्रुप
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

डिजिटल महासागर मीडिया ग्रुप
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

महासागर युट्यूब न्यूज चॅनल
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता. | महासागर मीडिया ग्रुप बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.

## ४ प्रवाशी ठार, २० हून अधिक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १९ :
पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघाताची घटना ताजी असतानाच, आज पहाटे मालेगाव-मनमाड महामार्गावर भीषण अपघात झाला आहे.

**थेट ट्रॅव्हल्सच्या केबिनमध्ये घुसली पिकअप**

पुण्याकडून मालेगावकडे येणारी एक खाजगी ट्रॅव्हल्स आणि समोरून जाणाऱ्या पिकअप वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी आहेत. तसेच बसमधील २० हून अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

ही दुर्घटना मालेगाव तालुक्यातील वऱ्हाणे गावाजवळ आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली. पुण्याहून प्रवाशांना घेऊन मालेगावकडे निघालेली खाजगी ट्रॅव्हल्स वेगात असताना समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाशी तिची जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की, पिकअप वाहन थेट बसच्या पुढील भागामध्ये घुसले. या धडकेत बसच्या दर्शनी भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला. या घटनेत चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, हे सर्व मालेगाव येथिल रहिवाशी असल्याची माहिती समोर आली आहे.

अपघाताचा आवाज ऐकताच वऱ्हाणे गावातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. मालेगाव पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. कार आणि बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न केले.

## मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही..

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :
बिहारमधील नितीश कुमार सरकारने मुंबईत 'बिहार भवन' उभारण्याची घोषणा केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या प्रस्तावावर अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, मुंबईत बिहार भवन कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा इशारा मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवका यशवंत किल्लेदार यांनी दिला आहे.

# ५० हजार लोकांचा माकपचा अतिभव्य मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. १९ :
मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आज पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून आलेल्या सुमारे ५० हजार लोकांचा एक अतिभव्य पायी मोर्चा काढला.



हा मोर्चा डहाणू तालुक्यातील चारोटी येथून सुरू झाला असून, रात्री मनोर येथे मुक्काम करेल आणि उद्या पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कूच करेल. जोपर्यंत सरकारच्या वतीने निश्चित कालमर्यादेसह लेखी स्वरूपात आपल्या ज्वलंत आणि प्रलंबित मागण्या मान्य केल्या जात नाहीत तोपर्यंत हा प्रचंड जनसमुदाय पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनिश्चित काळासाठी धरणे आंदोलन करणार आहे.

अखिल भारतीय किसान सभा (एआयकेएस), सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू), अखिल भारतीय जनवादी महिला संघटना (एडवा), डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय), स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच (एएआरएम) यांसारख्या संघटनाही मोठ्या संख्येने सामील झाल्या आहेत.

या मोर्चाचे नेतृत्व माकपचे पॉलिट ब्युरो सदस्य आणि एआयकेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, पॉलिट ब्युरो सदस्य आणि एडवाच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, केंद्रीय समिती सदस्य, माकप राज्य सचिव आणि किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, केंद्रीय समिती सदस्य आणि सीटूचे राज्य सचिव, डहाणूचे दोन वेळा आमदार असलेले विनोद निकोले, राज्य सचिवमंडळ सदस्य आणि एएआरएमचे राज्य निमंत्रक किरण गहला आणि इतर अनेक जण करत आहेत.

मंगळवारी सीपीएमचे पॉलिट ब्युरो सदस्य आणि अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस विजू कृष्णन हे देखील या मोर्चात सामील होतील. अनेक प्रलंबित मागण्यांसाठी हा विराट मोर्चा काढण्यात आला आहे.

## मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात माघी श्री गणेश जयंती महोत्सव



■ **मुंबई** : मुंबईचे आराध्य दैवत असलेल्या प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात माघी गणेश जयंतीचे औचित्य साधून 'माघ श्री गणेश जयंती महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आज, १९ जानेवारीपासून सुरू झालेला हा उत्सव २५ जानेवारीपर्यंत चालणार असून, सात दिवसांच्या या सोहळ्यात धार्मिक विधींसह सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांना मिळणार आहे.

महोत्सवाच्या काळात मंदिरात दररोज पहाटेपासूनच चैतन्याचे वातावरण असणार आहे. कार्यक्रमांची सुरुवात दररोज पहाटे ५:०० ते ५:३० या वेळेत होणाऱ्या काकड आरतीने होईल. त्यानंतर दिवसभर महा नैवेद्य, अभिषेक आणि नमस्कारन यांसारखे पारंपरिक वैदिक विधी संपन्न केले जाणार आहेत. भक्तांना बाप्पाचे मंगलमय रूप डोळ्यात साठवण्यासाठी मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे दररोज संध्याकाळी आयोजित केले जाणारे सांस्कृतिक कार्यक्रम. यामध्ये देशभरातील प्रख्यात कलाकार आपली कला बाप्पाच्या चरणी अर्पण करणार आहेत. यामध्ये भजन, लोकनृत्य, शास्त्रीय गायन, शास्त्रीय नृत्य आणि वाद्य संगीताचे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

२२ जानेवारी रोजी माघी गणेश जयंतीचा मुख्य सोहळा पार पडणार आहे. या दिवशी दुपारी ३:०० वाजता श्री सिद्धिविनायकाची एक भव्य रथ शोभायात्रा काढली जाणार आहे. सजवलेल्या रथातून बाप्पा आपल्या भक्तांच्या भेटीला येणार असून, ही शोभायात्रा पाहण्यासाठी आणि बाप्पाच्या दर्शनासाठी मुंबईतील भाविकांची अलोट गर्दी होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सिद्धिविनायक मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी दिली.

## डॉक्टर संग्राम पाटील यांची मुंबई विमानतळावर पुन्हा चौकशी



■ **मुंबई** : भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरीक डॉक्टर संग्राम पाटील यांना आज पुन्हा मुंबई विमानतळावर चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. या चौकशीच्या फेऱ्यात त्यांचे लंडनला जाणारे विमान सुटल्यामुळे त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला आहे.

डॉक्टर संग्राम पाटील हे मूळचे जळगावचे आहेत. ते सध्या ब्रिटनमध्ये स्थायिक आहेत. गत 10 जानेवारी रोजी ते आपल्या कुटुंबासह मायदेशी परतले होते. त्यानंतर मुंबई विमानतळावर त्यांना चौकशीच्या नावाखाली दिवसभर बसवून ठेवण्यात आले होते. त्यानंतर सायंकाळी उशिरा त्यांची सुटका करण्यात आली होती. सोशल मीडियावरील एका पोस्टच्या संदर्भात त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. संग्राम पाटील हे भाजप सरकारवरील आपल्या टीकेसाठी ओळखले जातात. त्यातूनच त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप झाला. त्यामुळे त्याचे सोशल मीडियात तीव्र पडसाद उमटले होते. त्यानंतर आज 19 जानेवारी रोजी ते आपल्या कुटुंबासह लंडनच्या दिशेने निघाले होते. पण मुंबई विमानतळावर पुन्हा त्यांना चौकशीला सामोरे जावे लागले.

संग्राम पाटील यांनी आपण 19 जानेवारी रोजी सकाळच्या विमानाने ब्रिटनला परत जाणार असल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांना दिली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरोधात जारी करण्यात आलेले लूक आऊट सर्क्युलर मागे घेण्याची ग्वाही दिली होती. संग्राम पाटील आज सकाळी 8 च्या इंडिगोच्या विमानाने ब्रिटनला जाण्यासाठी मुंबई विमानतळावर पोहोचले.

पण इमिग्रेशन काउंटरवरच त्यांना थांबवण्यात आले. त्यांना विमानात चढण्यास मज्जाव करण्यात आला. या गडबडीत त्यांचे लंडनचे विमान सुटले. विशेष म्हणजे डॉक्टर संग्राम पाटील यांच्याविरोधात सायबर क्राईम विभागात माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाजपची कुजबुज आणि पडद्याआडचा डाव उघड
# महापौरपदासाठी शिंदेसेनेची ठाम लढत

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १९ :** मुंबई महापालिकेच्या निकालानंतर सत्तेची गणिते जरी स्पष्ट दिसत असली, तरी खरी राजकीय लढाई आता सुरू झाली आहे–ती म्हणजे महापौरपदावरची. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी स्पष्ट बहुमत नसल्याने सत्ता प्रत्यक्षात कुणाच्या हातात जाणार, याचा निर्णय अजूनही लटकलेलाच आहे. आणि याच टप्प्यावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपल्या २९ नगरसेवकांच्या बळावर भाजपसमोर निर्णायक भूमिका घेतली आहे.

याच पार्श्वभूमीवर, सध्या माध्यमांमध्ये जे ठाकरे-फडणवीस संवाद आणि ६५ नगरसेवक अनुपस्थित राहण्याचे मेगाप्लॅन यासारखे वृत्त पेरले जात आहेत, ती राजकीय रणनीती नसून थेट शिंदेसेनेवर दबाव आणण्याची भाजपपुरस्कृत खेळी असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे.

संख्या कमी असूनही भाव वाढले आहेतह्न हे सत्य पचवता न आल्यामुळेच शिंदेसेनेला कोंडीत पकडण्यासाठी अशा बातम्या पेरल्या जात असल्याचे राजकीय जाणकार सांगतात.

मुंबईच्या महापौरपदासाठी शिंदेसेना ठाम भूमिका घेत अडून बसली आहे, यात काहीही गैर नाही. कारण २९ नगरसेवक असले तरी महापौरपदाची किल्ली आज शिंदेसेनेकडेच आहे.

भाजप सर्वात मोठा पक्ष असला, तरी शिंदेसेनेशिवाय महापौर बसवता येणार नाही, ही वस्तुस्थितीच आता भाजपसाठी डोकेदुखी ठरत आहे. म्हणूनच अचानक देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात संवाद सुरू असल्याच्या कुजबुजी माध्यमांतून बाहेर फेकल्या जात आहेत, असा शिंदेसेना समर्थकांचा आरोप आहे.

खरं पाहिलं तर, ६५ नगरसेवक अनुपस्थित राहतील हा तथाकथित मेगाप्लॅन केवळ राजकीय दबावाचं हत्यार आहे. ठाकरे गटाने जर खरंच अशी भूमिका घेतली, तर ती लोकशाही प्रक्रियेचीच थट्टा ठरेल. पण या चर्चा पेरण्यामागचा खरा हेतू एकच–शिंदेसेनेच्या आक्रमक आणि वैध मागण्या सौम्य करणे. म्हणजेच, संख्या कमी असूनही निर्णायक ठरत असलेल्या शिंदेसेनेला राजकीय कात्रीत पकडण्याचा प्रयत्न.



शिंदेसेनेने आपल्या नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेलमध्ये सुरक्षित ठेवले, यावरून टीका केली जाते. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की फोडाफोडीच्या राजकारणाचा अनुभव शिंदेसेनेने स्वतः घेतलेला आहे, त्यामुळे आपल्या नगरसेवकांचे संरक्षण करणे ही सावध आणि योग्य राजकीय भूमिका आहे. हे हॉटेल पॉलिटिक्स नव्हे, तर लोकशाहीत मिळालेल्या संख्याबळाचे संरक्षण आहे.

कल्याण - डोंबिवलीतील घडामोडींचा हवाला देत मुंबईतील सत्तानाट्याशी त्यांची सांगड घालण्याचा प्रयत्नही दिशाभूल करणारा आहे. शिंदेसेना आज मुंबईत स्पष्ट आणि उघड भूमिकेत आहे–महापौरपद, स्थायी समिती आणि इएरळसारख्या महत्त्वाच्या समित्यांमध्ये सत्तेचा न्याय्य वाटा. ही मागणी आक्रमक नसून, लोकशाही तत्वांवर आधारित आहे. आज एक गोष्ट स्पष्ट आहे,मुंबईचा महापौर कागदी संख्याबळावर नव्हे, तर प्रत्यक्ष पाठिंब्यावर ठरणार आहे. आणि हा पाठिंबा आज शिंदेसेनेकडे आहे. त्यामुळे दबाव तंत्र, कुजबुज, मेगाप्लॅन किंवा पडद्याआडच्या चर्चांद्वारे शिंदेसेनेला झुकवता येईल, हा गैरसमज ठरणार आहे.

एकूणच, मुंबईच्या महापौरपदासाठी सुरू असलेल्या या सत्तासंघर्षात शिंदेसेना केवळ आकड्यांची नाही, तर आत्मविश्वासाची आणि ठाम राजकीय भूमिकेची लढाई लढत आहे. आता प्रश्न हा नाही की शिंदेसेना अडून बसली आहे का; खरा प्रश्न असा आहे–निर्णायक ठिकाणी उभ्या असलेल्या शिंदेसेनेला डावलून मुंबईत सत्ता स्थापन तरी कशी होणार?

# मुंबई सोडू नका!

## भाजपकडून नवनिर्वाचित नगरसेवकांना कडक सूचना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** मुंबई महापालिकेतील सत्तास्थापनेचा खेळ निर्णायक टप्प्यात पोहोचत असतानाच भारतीय जनता पक्षाने नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी स्पष्ट आणि कडक सूचना जारी केल्या आहेत.

पुढील आठ दिवस मुंबईबाहेर कुणीही जाऊ नये, असा थेट संदेश भाजपच्या वरिष्ठ पातळीवरून देण्यात आला असल्याची माहिती आहे. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी आठ ते दहा दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता लक्षात घेऊन ही खबरदारी घेतल्याचे बोलले जात आहे.

महापालिका निवडणुकीत संख्याबळात अव्वल ठरलेला भाजप सध्या प्रत्येक हालचाल मोजून टाकत आहे. महापौरपदाचे आरक्षण जाहीर होणे हा सत्तास्थापनेच्या दाव्याचा महत्त्वाचा टप्पा असल्याने, तोपर्यंत कोणतीही धोकादायक पोकळी निर्माण होऊ नये, यासाठी नगरसेवकांना शहरातच उपलब्ध राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सूत्रांच्या मते, सत्तासंघर्षाच्या या निर्णायक क्षणी एकही दुवा सैल पडू नये यासाठी पक्ष विशेष दक्षता घेत आहे.

महापालिकेतील समीकरणे अजून स्थिर नसताना, पडद्याआड हालचाली, चर्चांच्या फेऱ्या आणि दबाव राजकारणाला वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपकडून ही सूचना देण्यात आल्याचे मानले जाते. सगळे नगरसेवक शहरातच असतील, तर निर्णयाच्या क्षणी पक्षाची एकजूट आणि उपस्थिती अबाधित राहील, असा पक्षाचा हिशोब आहे.

महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतरच भाजप औपचारिकरीत्या सत्तास्थापनेचा दावा करणार असल्याचे संकेत आहेत. तोपर्यंत कोणत्याही अफवा, फोडाफोडीचे प्रयत्न किंवा राजकीय खेळींना वाव मिळू नये, यासाठीच ही रणनीती आखण्यात आल्याची चर्चा आहे. सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ, मित्रपक्षांशी समन्वय आणि कायदेशीर प्रक्रिया यांचा मेळ घालत भाजप अंतिम चाली खेळण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

एकूणच, मुंबईबाहेर नको ही केवळ सूचना नाही, तर महापालिकेतील सत्तेची चावी आपल्या हातात ठेवण्याचा ठाम निर्धार आहे. आरक्षण जाहीर होताच भाजपचा पुढचा डाव उघड होणार असून, मुंबईच्या राजकारणात कोण बाजी मारतो, याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## दुसऱ्या दिवशीही माकपचे आंदोलन सुरूच

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १९ :** दिंडोरी तालुक्यात माकपने विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढला. दुसऱ्या दिवशी तहसीलदार मुकेश कांबळे व मोर्चाचे नेतृत्व करणारे जिल्हा सेक्रेटरी रमेश चौधरी, तालुका अध्यक्ष आप्पा वाटणे, लक्ष्मीबाई काळे यांच्यात चर्चा झाली. मात्र मागण्यांवर कुठलाही तोडगा निघाला नाही. त्यामुळे बिऱ्हाड मोर्चाचे ठिय्या आंदोलन सुरूच राहिले आहे.

तालुक्यातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे, त्यांची त्वरित देखभाल दुरुस्ती करावी, वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करावी, पाण्याचे नियोजन करून शेतकरी व औद्योगिक वसाहतींना पाणी पुरवठा व्हावा अशा अनेक मागण्यांसाठी माकपच्या वतीने बाजार समिती ते तहसील कार्यालय असा बिऱ्हाड मोर्चा काढून तहसील कार्यालयाच्या आवारात महिला-मुलांसह तळ ठोकला आहे. आमच्या मागण्यांचा त्वरित विचार व्हावा अशी भूमिका घेत मोर्चेकऱ्यांनी आंदोलन सुरूच ठेवले होते.

## नितीश सरकारचा मुंबईत मास्टरस्ट्रोक

### ३० मजली बिहार भवन उभारून आर्थिक राजधानीत ताकद वाढवणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :** देशाची आर्थिक राजधानी मुंबईत आता बिहार सरकारची ठळक आणि भक्कम उपस्थिती दिसणार आहे.



मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहार सरकारने मुंबईत अत्याधुनिक आणि भव्य बिहार भवन उभारण्याचा निर्णय घेतला असून, हा प्रकल्प केवळ एक इमारत नसून बिहारच्या प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीचा नवा अध्याय ठरणार आहे. मुंबईत वास्तव्यास असलेल्या लाखो बिहारवासीयांसाठी हे भवन एक महत्त्वाचे आधारकेंद्र ठरणार असल्याचं मानलं जात आहे.

प्रस्तावित बिहार भवन हे 30 मजली असणार असून, बेसमेंटसह इमारतीची एकूण उंची सुमारे 69 मीटर इतकी असेल. ही इमारत अत्याधुनिक वास्तूशैलीत उभारली जाणार असून, आधुनिक शहरी नियोजन आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात आधुनिकतेसोबतच पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून केला जाणार आहे.

या भव्य इमारतीत सौर पॅनेल बसवण्यात येणार असून, ऊर्जेच्या गरजांसाठी नवीकरणीय स्रोतांचा वापर करण्यात येईल. पाण्याच्या पुनर्वापरासाठी अत्याधुनिक एसटीपी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. याशिवाय, इमारतीभोवती हिरवळीचे क्षेत्र विकसित करण्यात येणार असून, हा प्रकल्प ग्रीन बिल्डिंग संकल्पनेनुसार उभारला जाईल. त्यामुळे पर्यावरणीय जबाबदारी जपत आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा बिहार सरकारचा उद्देश स्पष्ट दिसतो.

## ठाणे महापौर पदावरही भाजपचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** भाजपने आता थेट शिंदेंचा बालेकिल्ला असणाऱ्या ठाण्याच्या महापौरपदावर दावा सांगितला आहे. भाजपच्या या राजकीय खेळीमुळे शिंदे गटाची मोठी अडचण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सद्यस्थितीत ठाणे महापालिकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे बहुमत आहे. पण सत्ता राखण्यासाठी त्यांना भाजपची साथ महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी ठाण्याच्या महापौर पदावर दावा सांगितला आहे.

ठाणे महापालिका निवडणुकीत शिंदे गटाला बहुमत मिळाले. पण आमचाही सन्मान झाला पाहिजे. भाजपने शीळ ते वडवली या पट्ट्यात अत्यंत प्रभावी कामगिरी केली. आमच्या वाट्याला ज्या जागा आल्या, तिथे आम्ही 100 टक्के स्ट्राईक रेट राखला. आता आमची ताकद वाढली आहे. त्यामुळे ठाण्याचा महापौर भाजपचा असावा अशी आमच्या कार्यकर्त्यांची मागणी आहे. ठाणे महापालिकेत भाजपला किमान 2 वर्षांसाठी महापौरपद मिळावे. अन्यथा आम्ही सत्तेत न राहता विरोधी बाकावर बसणे पसंत करू, असा इशारा निरंजन डावखरे यांनी दिला आहे. शिंदे गटाच्या मुंबईतील राजकीय दबावतंत्राला उत्तर म्हणून डावखरेंनी ठाण्यात हा डाव टाकल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

दुसरीकडे, भाजपने मुंबईच्या महापौरपदाच्या मुद्यावर ठाकरे गटाशी बोलणी सुरू केल्याचाही दावा केला जात आहे. शिंदेंच्या फोडाफोडीच्या राजकारणाला शह देण्यासाठी भाजपने हे पाऊल उचलल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणी उद्धव ठाकरे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात फोनवरून चर्चा झाल्याचेही सांगितले जात आहे. पण तूर्त भाजप आमदार प्रवीण दरेकर व ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी हा दावा फेटाळला आहे.

## शिंदेंच्या साथीने कोल्हापुरात सतेज पाटील फिरवणार सत्ता गेम?

■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १९ :** राज्यातील सत्तासमीकरणांचा केंद्रबिंदू सध्या केवळ मुंबईपुरता मर्यादित राहिलेला नसून, त्याचे पडसाद आता थेट कोल्हापुरात उमटताना दिसत आहेत. कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरल्यानंतरही सत्ता स्थापनेचा मार्ग अद्याप स्पष्ट झालेला नाही.

काँग्रेसचे नेते, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष आणि आमदार सतेज पाटील यांनी केलेले सूचक वक्तव्य चर्चेचा केंद्रबिंदू ठरले आहे. पडद्यामागे काय सुरू आहे, ते सध्या जाहीर करता येणार नाही, असे म्हणत त्यांनी अधिक तपशील देण्याचे टाळले. मात्र, त्यांच्या या एका वाक्यानेच कोल्हापुराच्या राजकारणात अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

कोल्हापूर महापालिकेतील सध्याचे संख्याबळ पाहता, काँग्रेसकडे 34 जागा असून ती सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपकडे 26 जागा, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे 15 जागा आहेत. अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे 4 जागा, शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडे 1 जागा आणि इतरांकडे 1 जागा आहे. महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी 41 जागांची मॅजिक फिगर आवश्यक आहे. सध्या कोणताही पक्ष एकट्याच्या जोरावर हा आकडा गाठू शकलेला नाही, त्यामुळे युतीशिवाय पर्याय उरलेला नाही.

## निवडणुकीतील पराभवानंतर रूपाली ठोंबरेंचा संताप

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :** पुण्याच्या राजकीय पटलावर वजनदार मानल्या जाणाऱ्या राष्ट्रवादीच्या अनेक नेत्यांना या निवडणुकीत मतदारांनी नाकारले आहे. यामध्ये प्रामुख्याने माजी महापौर दत्तात्रय धनकवडे यांचा समावेश असून, त्यांच्या पराभवाने राजकीय वतुर्ळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.



मात्र, सर्वाधिक चर्चा रंगली आहे ती राष्ट्रवादीच्या आक्रमक नेत्या आणि माजी प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे यांच्या पराभवाची. रूपाली पाटील ठोंबरे यांचा पराभव झाल्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आली आहे.

अनेक युजर्सकडून त्यांच्या विरोधात आक्षेपार्ह पोस्ट आणि कमेंट्स केल्या जात आहेत. या ट्रोलिंगची गंभीर दखल घेत रूपाली पाटील यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. "टीका करणे हा लोकशाहीचा भाग असला तरी, वैयक्तिक पातळीवर जाऊन चिखलफेक करणाऱ्यांना सोडणार नाही," असे म्हणत त्यांनी थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. सायबर गुन्हे शाखेकडे या तक्रारी केल्या जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## गझनीच्या महमूदप्रमाणे कारवाई



### हर्षवर्धन सपकाळांचा हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** सोमनाथाचे मंदिर गजनीच्या मेहमुदने उद्ध्वस्थ केले त्याचपद्धतीने भारतीय जनता पक्ष व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीमधील पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी बांधलेल्या मणिकर्णिका घाटावर बुलडोझर चालवला आहे. भाजप व नरेंद्र मोदी यांना अहिल्यादेवींच्या स्मृती पुसून टाकायच्या आहेत, म्हणूनच अत्यंत निर्दयी व विकृतपणे घाट व घाटावरील मूर्ती नष्ट करण्यात आल्या आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

सपकाळ म्हणाले, अहिल्यादेवींचा 300 वा जन्मशताब्दी उत्सव साजरा करण्यासाठी भाजप सरकार एकीकडे कोट्यवधी रुपये खर्च करत आहे तर दुसरीकडे मात्र अहिल्यादेवींच्या स्मृती पुसण्याचे पाप करत आहे. हिंदुत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या भाजपचा हा दुटप्पीपणा जनतेच्या समोर उघड झाला आहे. नरेंद्र मोदींच्या अंगात गजनीचे भूत शिरले आहे, असा हल्लाबोल सपकाळ यांनी केला आहे. अहिल्यादेवींचा अपमान महाराष्ट्राची जनता कदापी सहन करणार नाही. भाजप व मोदींच्या या कृतीविरोधात काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र विरोध करेल, असा इशाराही सपकाळ यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेत ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष यशपाल भिंगे म्हणाले, अहिल्यादेवींनी 1771 मध्ये वाराणसी मणिकर्णिका घाट बांधला, या घाटावर 10 जानेवारी रोजी भाजप सरकार व नरेंद्र मोदी यांनी बुलडोझर चालवला. यावेळी अहिल्यादेवींच्या मूतीर्ची विटंबना करण्यात आली, हे सर्व धनगर समाजाचा स्वाभिमान दुखवणारे आहे. 27 तारखेपर्यंत मोदींनी जाहीर माफी मागावी अन्यथा भाजपच्या एकाही मंत्र्याला महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

अहिल्यादेवी यांनी बांधलेल्या घाटावर बुलडोझर चालवून धनगर समाजाचा घोर अपमान केल्यानंतरही भाजपा आमदार गोपीचंद पडळकरसारखे धनगर समाजाचे नेते म्हणवणारे गप्प कसे बसले, असा सवालही यशपाल भिंगे यांनी केला आहे.

# आव्हान - चान्सलर्स ब्रिगेड २०२५- २६ चे कृषि विद्यापीठात आयोजन

## राज्यभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने फुलले कृषी विद्यापीठाचे प्रक्षेत्र!

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १९ :** महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिर आव्हान (चान्सलर्स ब्रिगेड) 2025-26" या सात राज्यस्तरीय दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाची जबाबदारी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडे देण्यात आली आहे.

17 ते 24 जानेवारी 2026 दरम्यान विद्यापीठाच्या अकोला मुख्यालयी आयोजित महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर कृतीयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्वप्रथम आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाचे आपत्कालीन परिस्थितीत व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन झाले. दुपारच्या सत्रात लँड स्लाईड रेस्क्यू ऑपरेशन, वैयक्तिक आणि परिवाराची आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, सामुदायिक ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन, भूकंप, वीज पडणे, चक्रीवादळ, भूस्खलन, जंगलातील वणवा आदी प्रसंगी कांय करावे आणि कांय नाही त्यावर कृतियुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी योगा, प्राणायाम, कवायत नंतर रुग्णाची काळजी, अत्यवस्थ रुग्णांना सीपीआर देऊन त्याचा जिव वाचविण्याचे कौशल्य अवगत करण्यात आले.



प्रशिक्षण राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन पदकाची टीम देत असून त्यांचे कडील शस्त्र सज्जता आणि आपत्कालीन परिस्थिती वापरावयाची साधने यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांचे आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

शिबिरात मुंबई विद्यापीठ, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, रातुम नागपूर विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्धा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक नागपूर, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ लोणेरे, होमी बाबा राज्य विद्यापीठ मुंबई, हैदराबाद सिंध नॅशनल विद्यापीठ मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक सहभागी झाले आहेत.

आयोजनासाठी कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनात संचालक शिक्षण डॉ. देवानंद पंचभाई, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी मिलिंद काळे, कमांडर सारंग कुर्वे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कोल्हापूर विद्यापीठाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे वित्त व लेखा अधिकारी रवींद्र पाटील, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे वित्त व लेखा अधिकारी भास्कर पाथरे तथा संचालक राष्ट्रीय सेवा योजना डॉ. सदानंद भोसले,आव्हान शिबीर नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉ. सतीश कोलते, मुंबई विद्यापीठाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. मीनाक्षी गुरव सोलापूर विद्यापीठाचे विद्यापीठ समन्वयक रामेश्वर कोठावळे, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीचे विद्यापीठ समन्वयक डॉ. राजेश कदम, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, एन डी आर एफ चे सर्व सदस्य अथक परिश्रम घेत आहेत.

आयोजनासाठी विविध समित्यांचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, रासेयो स्वयंसेवक,राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट्स, विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी, राज्यभरातील सुमारे दीड हजार स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनींनी आपले सक्रिय योगदात देत आहेत.

## विनयभंग प्रकरणी आरोपीस १ वर्ष कारावासाची शिक्षा व २००० रू दंड

**पातूर:** पातुर येथील प्रथम वर्ग न्यायदडाधिकरी यांनी पोलिस स्टेशन पातुर हददीतील ग्राम माझोड येथे दिनांक २९/०७ / २०१६ रोजी फिर्यादी पिडीता यांनी घडलेल्या घटनेची तक्रार दिली कि ,घटनेतील आरोपी शंकरराव विश्वासराव टाले रा. माझोड ता. पातुर जि. अकोला याने पिडीता हि शौच्छास जात असतांना आरोपिने पिडीताचा पाठलाग करून तिचा हात धरून, तु मला आवडतेस असे म्हणुन विनयभंग केला वरून आरोपी विरूध्द प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता .

# मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी घेतली टॅक्स वसुलीबाबत आढावा बैठक





■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
दि. १९ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे अकोला महानगरपाकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृह येथे मालमत्ता कर विभागाची कर वसुली बाबत आढावा बैठक घेतली.

या बैठकीत सर्वप्रथम मनपा आयुक्त यांनी आजपर्यंत करण्यात आलेल्या मालमत्ता कर वसुली बाबतचा आढावा घेतला. तसेच यावेळी, जास्त मोठे प्रमाणात थकबाकीदार असलेल्या मालमत्ता धारकांकडे भेटी देऊन थकित कराची वसुली करणे, जे मालमत्ता धारक भेटी देऊनही थकित कराचा भरणा करत नाही अशा मालमत्ता धारकांवर नियामानुसार कार्यवाही करणे, तसेच महानगरपालिकेचा उत्पन्नाच्या दृष्टीने मालमत्ता कर हे मुख्य स्त्रोत असून मनपाच्या उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता शहरात नवीन बनलेल्या इमारतींवर कर आकारणी करणे आदींबाबत सुचना दिल्या. तसेच मालमत्ता कर धारकांना कर भरणे अधिक सोईचे व्हावे यासाठी शनिवार आणि आणि रविवार सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्यासाठी मनपा आयुक्तांनी यावेळी सूचना दिल्या.

# पर्यावरण रक्षण करा,नाहीतर विनाश अटळ

## वनराई साहित्य संमेलनात बालकुमारांचा जागृतीपूर्ण परिसंवाद

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात पार पडलेल्या दुसऱ्या राज्य स्तरीय वनराई बालकुमार साहित्य संमेलनात ‟पर्यावरण रक्षण करा, नाहीतर विनाश अटळ..!” या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या बालकुमारांच्या परिसंवादाने उपस्थित रसिक, पालक व साहित्यप्रेमींना विचारप्रवण केले. या परिसंवादातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश बालवक्त्यांच्या प्रभावी आणि आत्मविश्वासपूर्ण मांडणीतून ठळकपणे समोर आला.या परिसंवादात स्मित सचिन भोयर (स्कूल ऑफ स्कॉलर, अकोला), मृणाली सागर उकर्डे (गुरुकुंज इंग्लिश कॉन्व्हेंट, बोथा काजी, ता. खामगाव) आणि अर्चना ओईम्बे (महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, गांधीग्राम),आरुषी भुजाडे (पि. एम. श्री. जि. प. विद्यालय कामरगाव )या बालवक्त्यांनी सहभाग नोंदवला. वाढती वृक्षतोड, प्रदूषण, पाणीटंचाई, हवामान बदल यांसारख्या गंभीर पर्यावरणीय संकटांवर त्यांनी परखड व अभ्यासपूर्ण विचार मांडले. निसर्गाशी समतोल राखण्याची जबाबदारी मानवाने स्वीकारली नाही, तर भविष्यात विनाश अटळ आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी संमेलनाध्यक्षा डॉ. प्रतिमा इंगोले उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनय दांदळे, अभंगकार प्रवीण हटकर, कवी संतोष भाकरे कथालेखिका अर्चना मोरे, यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांनी बालकुमारांच्या स्पष्ट भूमिकेचे कौतुक करत पर्यावरण रक्षण ही आजच्या काळातील सर्वांत मोठी सामाजिक गरज असल्याचे प्रतिपादन केले.

बालपिढीचे प्रतिनिधी म्हणून बालवक्त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी संघटित होण्याचा, झाडे लावण्याचा, जलस्रोत जपण्याचा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. हीच पिढी भविष्यात निसर्गाचे रक्षण करणारी जबाबदार पिढी ठरेल,






असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या परिसंवादाचे संचालन तुळिशदास खिरोडकार यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत आयोजन समितीच्या वतीने बबनराव कानकिरड आणि ज्ञानेश्वर मांडेकर यांनी केले.चौथ्या सत्रात बालकुमारांचे कवी संमेलन पार पडले. कु.रिधी अतुल काठोळे,मोहिनी नंदकिशोर माळी, गौरी योगरा चोंडके,कु.अशविनी प्रमोद ओईम्बे, आरुषी संदीप भुजाडे, जान्हवी जीवन देशमुख श्रावणी जगदिश ठाकरे, रिद्धी दिलीप जुनन काय धनश्री केशव चौके, आरूषी ठाकरे, अनुष्का ठाकरे तेजस्विनी धामोडे मोनाली देशमु खुशी ठाकरे, नंदिनी देशमुख, सुमित राठोड,विष्णु पंत जोध, शिवराज जामोदे यांनी सुंदर रचना सादर केल्या.

## पाणी विकासाचा मुद्दा की हक्कांवर गदा? सामाजिक कार्यकर्त्या रजनीशा पोटे यांचा सवाल

■तेल्हारा,दि.१९ (प्रतिनिधी)■
पाणी हा विकासाचा मुद्दा असला, तरी तो स्थानिक नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारा ठरू नये, असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या रजनीशा पोटे यांनी उपस्थित केला आहे. पाणीवाटप, पाणी वळवण आणि पाणीशुद्धीकरण प्रकल्पांबाबत राज्य सरकार व संबंधित यंत्रणांची भूमिका स्पष्ट नसल्याने स्थानिक शेतकरी व नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी हिवरखेड येथे झालेल्या निवडणूक सभेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुमच्या हक्काचे पाणी दुसऱ्या कोणाला घेऊ देणार नाही असे स्पष्ट आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर प्रत्यक्षात या आश्वासनांची अंमलबजावणी होताना दिसत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.तेल्हारा तालुक्यातील वान धरण तसेच बाळापूर पाणी योजनेअंतर्गत पाणीशुद्धीकरण प्रकल्पाचे काम वारी भैरवगड येथे सुरू असताना, या प्रकल्पांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी एकदाही प्रत्यक्ष भेट देऊन किंवा खुली चर्चा करून भूमिका स्पष्ट केली नसल्याचे पोटे यांनी नमूद केले. दरम्यान, बाळापूर पाणी वळवण्याचा सुमारे २०२



कोटी रुपयांचा प्रकल्प आणि त्यासाठी टाकण्यात येणाऱ्या पाईपलाईनबाबत स्थानिक शेतकऱ्यांच्या विश्वासात न घेता निर्णय घेतले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

शेतीसाठी आवश्यक पाणी कमी पडण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये असून, पारदर्शक चर्चा न करता हे प्रकल्प राबवले जात आहेत,” असे मत व्यक्त करण्यात आले.१२ ऑक्टोबर २०२९ रोजी अकोट येथे झालेल्या विधानसभा निवडणूक सभेतही मुख्यमंत्री फडणवीस यांनी शब्द देतो, वान धरणाचे एक थेंब पाणीही कोणाला घेऊ देणार नाही, असे वक्तव्य केले होते. मात्र, आजच्या घडीला प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप होत आहे.

## जुना वादातून तरुणावर प्राणघातक हल्ला, चारही आरोपी दोन तासात अटक

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
दिनांक १९/०१/२०२६ रोजी अकोला शहरातील उमरी परिसरात युवक नामे ओम मोहन राउत, वय २० वर्षे, रामोटी उमरी, अकोला हा त्याचे मित्रासह दुचाकीने पि.के. व्हि. येथील शिवमंदिरात दर्शनासाठी जात असतांना रौनक मंगल कार्यालया समोर मोठी उमरी अकोला येथे यातील आरोपी नामे अंकुश पिंपळकर, रोशन होपल, गौरव काळे, अनूप वाहूरवाघ सर्व रा. लहान उमरी अकोला यांनी ओम राऊत याची गाडी अडवून एका वर्षापुर्वी झालेल्या जुन्या मारहाणी वरून राग मनात धरून संगणमत करून ओमची कॉलर पकडून शिवीगाळ करून त्याला जिवाने मारण्याचे उददेशाने अंकुष पिंपळकर याने त्याच्या हातातील लोखंडी रॉड, ओमचे डोक्यावर मारला व गौरव काळे याने ओम च्या पाठीमागून दोनवेळा चाकूने वार केले व



ईतरांनी त्याला लाथा बुक्यांनी मारहान करून त्याला गंभीर जख्मी केले अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सिव्हील लाईन येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्हयाचे गांभीर्य पाहता मा. पोलीस अधीक्षक सा. अकोला श्री. अर्चित चांडक यांनी मा. पोलीस निरीक्षक शंकर शेळके, स्था.गु.शा. अकोला महिला पो. नि. मालती कायटे पो.स्टे. सिव्हील लाईन यांना आरोपी याचा शोध घेउन तात्काळ अटक करणे कामी पथक तयार करण्याचे आदेश दिले.

# प्रजासत्ताक दिन समारंभाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ लालबहादूर शास्त्री क्रीडांगणावर होणार असून, त्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.प्रजासत्ताक दिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिका-यांनी घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, प्रजासत्ताक दिन समारंभात ध्वजवंदन,



पथसंचलन, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यादृष्टीने परिपूर्ण नियोजन करावे, तसेच संचलन, कवायतीच्या दृष्टीने आवश्यक सराव करावा. परिसराची स्वच्छता, पेयजल, अग्निशमन यंत्रणा, तसेच रूग्णवाहिका आदी सर्व जबाबदा-या संबंधित यंत्रणांनी चोखपणे पार पाडण्याचे निर्देश त्यांनी दिले.प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभात पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण लालबहादूर शास्त्री क्रीडांगणावर दि. २६ जानेवारीला सकाळी ९.१५ वा. होईल. जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण समारंभ सकाळी ८.१५ वा. होणार आहे.

## श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम वर्ष नांदेडमध्ये सोहळा; जिल्ह्यातून जाणार शेकडो भाविक

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे भव्य कार्यक्रम होणार असून, जिल्ह्यातून शेकडो भाविक उपस्थित राहणार आहेत.

श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षा निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी



चादर श्री गुरु तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने नागपूर व नवी मुंबई येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन झाले. आता २४ व २५ जानेवारीला नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रम होणार आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्यात येत आहे. या गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्यानिमित्त शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे. जिल्ह्यातून शेकडो भाविक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नांदेड येथे जाणार आहेत.

### उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक.

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
- अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक काळात उमेदवारांने केलेल्या खर्चाचा हिशोब मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथील निवडणूक हिशोब खर्च कक्ष येथे सादर करणे अनिवार्य आहे. झोन निहाय/प्रभागनिहाय निवडणूक खर्चाचा हिशोब घेण्याकरिता एकुण ६ पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

## गावोगावी संवादाचा झंझावात ! मराठा पाटील संघाची समाजसंवाद पदयात्रा उत्स्फूर्त स्वागत व सहभाग!!



■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
समाजाला जोडणारा, प्रश्नांना वाचा फोडणारा आणि परिवर्तनाची मशाल हाती घेणारा उपक्रम म्हणून ओळखली जाणारी मराठा पाटील संघ, बाळापूर आयोजित समाजसंवाद पदयात्रा सध्या तालुक्यातील गावोगावी जनमानसाचा ठाव घेत आहे. काजीखेड ते वाडेगांव दरम्यान १७ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या पदयात्रेला प्रत्येक गावातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून समाजबांधवांकडून उत्स्फूर्त आणि भावनिक स्वागत होत आहे.

गावाच्या वेशीवरच वारकरी संप्रदायाच्या पथकांसह, टाळ-मृदुंगाच्या गजरात, संत-महात्म्यांच्या अभंगांनी वातावरण भक्तीमय होत आहे. संपूर्ण गाव एकवटून पदयात्रेचे स्वागत करताना समाज एकजुटीचे जिवंत चित्र दिसून येत आहे. मुख्य रस्त्यांवरून काढण्यात येणाऱ्या प्रभात फेरीद्वारे जनजागृती केली जात असून, सामाजिक सलोखा आणि संघटनेचे महत्त्व प्रभावीपणे मांडले जात आहे.गावातील महिलांच्या वतीने जागोजागी रेखाटलेल्या रंगीबेरंगी रांगोळ्या, फुलांची उधळण आणि पारंपरिक पद्धतीने केलेले स्वागत या पदयात्रेचे वैशिष्ट्य ठरत आहे. टाळ-मृदुंगाचा निनाद आणि अभंग-भजनांमुळे संपूर्ण गाव परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत असून, ही पदयात्रा केवळ चालण्याची नसून विचारांची, संवादाची आणि परिवर्तनाची यात्रा ठरत आहे.

यानंतर गावातील मंदिर, समाजमंदिर किंवा सार्वजनिक ठिकाणी समारोपीय सभांचे आयोजन करण्यात येत आहे. या सभांमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी ग्रामस्थांना मार्गदर्शन करत असून, समाज संघटन, अनिष्ट चालीरीतींना आळा, कृषी, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत विषयांवर सखोल चिंतन केले जात आहे. गावकऱ्यांचे प्रश्न, अडचणी व समस्या थेट ऐकून घेऊन त्यावर पुढील काळात ठोस उपाययोजना राबवण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन‘ तयार करण्याचे महत्त्वाचे कार्य या पदयात्रेम धून सुरू आहे.

## पंतप्रधानांच्या ‘ज्ञान भारत’ संकल्पनेला बळ देणारा भारतीय ज्ञान महोत्सव-२०२६ यशस्वी





■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■
मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या ‟ज्ञान भारत संकल्पनेला तसेच केंद्र शासनाच्या भारतीय ज्ञान प्रणाली (IKS - Indian Knowledge Systems) उपक्रमाला बळ देणारा भारतीय ज्ञान महोत्सव-२०२६ अंतर्गत भव्य बक्षीस वितरण सोहळा रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी दीप अँटीक्स म्युझियम, बाबुळगाव, अकोला येथे अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.अवनी ग्लोबल फाउंडेशन, अकोला व दीप अँटीक्स म्युझियम यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत अकोला जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला.

या महोत्सवाची संकल्पना व प्रेरणा श्री. कुशल विजय सेनाड यांच्या संकल्पनेतून साकार झाली असून, कार्यक्रमाची सुरुवात श्री. आशिषजी उमाळे यांच्या बासरीवादनाने करण्यात आली. या ज्ञानमहोत्सवात भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित ७२८ प्रतिकृती,१२७३ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग,१८५ मार्गदर्शक शिक्षकांचे समर्पित योगदान तसेच ३० शाळांमधील ३५ परीक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत खघड च्या उद्दिष्टांशी पूर्णतः सुसंगत ठरला.बक्षीस वितरण सोहळ्याचे उद्घाटन श्री. प्रदीपजी नंद व सौ. दिपाली प्र. नंद यांच्या शुभहस्ते झाले.

**सूचना** — DSP MUTUAL FUND

ह्याद्वारे ही सूचना देत आहोत की डीएसपी म्युचुअल फंडाकडून आगामी गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रम/इनवेस्टर एज्यूकेशन प्रोग्रॅम (आयएपी) घेण्यात येईल. आयएपीचा तपशील खाली दिला आहे:

| दिवस आणि तारीख | पत्ता | वेळ |
|---|---|---|
| Tuesday, 20th January 2026 | Hotel Ceter Plaza, Kedia Plot, Holly Cross Convent Road, Ranpise Nagar, Akola, Maharashtra - 444005 | 6:00 PM |

आयएपीज्च्या सर्व नव्या माहितीसाठी dspim.com/IAP वर भेट द्या आणि इतर सर्व प्रकटीकरणासाठी dspim.com/IEID वर भेट द्या. डीएसपी म्युचुअल फंडाकडून गुंतवणूक प्रशिक्षण आणि जागरुतता उपक्रम. **म्युचुअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखीमेच्या अधीन आहे, स्कीमसंबंधी सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.**

## अर्णव व रोशन कॅरम स्पर्धेत राज्यस्तरावर

**अकोला:** प्रभात किड्स स्कूलचा अर्णव पटेल व रोशन खारोडे ह्या खेळाडूंनी विभागस्तरीय कॅरम स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन स्थानिक एलआरटी कॉलेज, अकोला येथे करण्यात आले होते.

# मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांनी घेतला स्वच्छता विभागाचा आढावा



■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■

१९ जानेवारी २०२६ - आज दि. १९ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्याव्दारे अकोला महानगरपाकेच्या डॉ.बाबासाहेब मुख्य सभागृह येथे अकोला महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन होणा-या स्वच्छतेच्या कामाचा आढावा. यावेळी मनपा आयुक्त डॉ.लहाने यांनी, मनपा स्वच्छता विभागाव्दारे शहरात दैनंदिन होणा-या स्वच्छतेच्या कामाबाबत आढावा घेतला. यावेळी मनपा आयुक्त यांनी कचरा घंटा गाडी बाबत नाराजी व्यक्त केली, तसेच सर्व स्वच्छता निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरापर्यंत कचरा घंटा गाडी गेलीच पाहिजे याकडे विशेष लक्ष घालून नियोजनपुर्ण काम करणे, शहरातील कचरा संकलनाबाबत लावण्यात आलेले क्यू आर कोड स्कॅनिंग करणे, शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढण्यासाठी नाल्यांचे साचलेले पणीही जबाबदार असल्याने शहरातील सर्व नालींचे सांडपाणी वाहता करणे, कचरा घंटा गाडी व्यतिरिक्त खुली जागा, नाली, नाले, व वस्तीच्या परिसरात कचरा टाकणा-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांना कचरा घंटा गाडी मध्येच ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून फक्त कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकणे संदर्भात प्रवृत्त करणे आदी सुचना दिल्या.

तसेच या कामांमध्ये कामचुकारपण केल्यास संबंधीत स्वच्छता निरीक्षकांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत यावेळी सांगिते. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर यांचेसह सर्व स्वच्छता निरीक्षकांची उपस्थिती होती.

# लाडक्या बहिणींवर अन्याय होऊ देणार नाही : आ. रणधीर सावरकर

## केवायसीतील तांत्रिक त्रुटींमुळे बंद झालेल्या लाभासाठी शासन दरबारी पाठपुराव्याचे आश्वासन

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■

लाडक्या बहिणी योजनेअंतर्गत महिलांना मिळणारा हक्काचा लाभ कोणत्याही परिस्थितीत बंद होऊ देणार नाही, असे ठाम अभिवचन आमदार रणधीर सावरकर यांनी दिले. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना या योजनेचा संपूर्ण लाभ मिळावा, यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज महिला व बालकल्याण अधिकारी कार्यालयात लाडक्या बहिणी योजनेच्या लाभासंदर्भात हजारो महिलांनी गर्दी केल्याची माहिती मिळताच, जनतेच्या समस्या तत्काळ समजून घेणारे आणि दिवसाचे तब्बल १८ तास नागरिकांसाठी कार्यरत असलेले आमदार रणधीर सावरकर यांनी त्वरित महिला व बालकल्याण अधिकारी गिरीश पुसतकर यांच्या कार्यालयाला भेट दिली.



यावेळी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान अनेक महिलांचे लाडक्या बहिणी योजनेचे पैसे चुकीच्या केवायसीमुळे बंद झाल्याचे निदर्शनास आले. केवायसी प्रक्रियेदरम्यान विचारण्यात आलेले तांत्रिक प्रश्न महिलांना नीट न समजल्याने तसेच प्रणालीतील त्रुटींमुळे केवायसी चुकीची भरली गेल्याचे स्पष्ट झाले. महिलांच्या भावना समजून घेत आमदार सावरकर यांनी उपस्थित महिलांना आणि त्यांच्या सोबत आलेल्या पुरुष मंडळींना धीर दिला. शासन दरबारी हा प्रश्न प्रभावीपणे मांडून केवायसी दुरुस्तीसाठी स्वतंत्र पर्याय (ऑप्शन) सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

माझ्या लाडक्या बहिणींचे हक्काचे पैसे मी कोणत्याही परिस्थितीत बंद होऊ देणार नाही,‌ असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. या वेळी अंबादास उमाळे, विठ्ठल चतरकर, राजेश बेले, अनिल गावंडे, वैभव माहुरे, नारायण बोर्डे, अंकुश इंगळे, राजेश ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## न्यू ईरा माध्यमिक विद्यालय,अकोला येथे

# दुमिर्ळ नाणी व टपाल तिकिटांचे ऐतिहासिक प्रदर्शन संपन्न

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■

न्यू ईरा माध्यमिक विद्यालय, अकोला येथे दि. १७ जानेवारी २०२६ रोजी माजी विद्यार्थी तथा संग्राहक श्री. मकरंद केशवराव उंटवाले यांच्या दुमिर्ळ नाणी, चलनी नोटा व टपाल तिकिटांच्या संग्रहाचे भव्य प्रदर्शन यशस्वीपणे पार पडले.या प्रदर्शनात प्राचीन, मध्ययुगीन, मुघलकालीन, ब्रिटिश-इंडिया तसेच स्वतंत्र भारतातील नाणी, नोटा, अयोध्येतील श्रीराम मंदिराचे चित्र असलेली नाणी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यातील सुवर्ण होन व ताम्रधातूची शिवराई, देश-विदेशातील चलन, प्लास्टिकची नाणी, ब्रिटिशकालीन पोस्टकार्ड्स, फर्स्ट-डे कव्हर्स तसेच रामायण, महाभारत, कुंभमेळा, भारतीय सेनादल व राष्ट्रपुरुषांवरील टपाल तिकिटे पाहायला मिळाली.प्रदर्शनाचे उद्घाटन प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. प्रा. विश्वनाथ गद्रे यांच्या शुभहस्ते व मुख्याध्यापक श्री. महेश ठोके यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी श्री. मकरंद उंटवाले, त्यांच्या पत्नी सौ. अंजलीताई, निवृत्त शिक्षक श्री. नरेश मानकर तसेच माजी विद्यार्थिनी सौ. अनुपमाताई आब्दे (पत्की) उपस्थित होत्या. त्यांनीही आपल्या संग्रहातील दुमिर्ळ नाणी व पोस्टकार्ड्स मांडले.या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी नरेश मानकर, अजयसिंग राजपूत, हबीब खानसाहेब, माजी विद्यार्थी आगरकर तसेच इतर सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.डिजिटल युगात इतिहासाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी देणारे हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक ठरले. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे संकेत संस्थाचालकांनी दिले आहेत.



## अकोल्यात बुधवार पासून वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सव

**अकोला** : सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने प्रमिलाताई ओक हॉल, अकोला या ठिकाणी दि. २१आणि २२जानेवारी २०२६ रोजी साय ६:३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक २१ रोजी सायंकाळी ६:३० वाजता प्रसिद्ध बंजारा नृत्य सादर होणार असून सादरकर्ता कला संघ हा बार्शीटाकळी तालुक्यातील साखरविरा या गावातील ललिता जाधव आणि कलावंत सादर करणार आहेत. गुरुवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता.महाराष्ट्राची लोककला वासुदेव ,गौधळ,भारुड कलापथक खंडीगमत इत्यादी लोककलेचे प्रकार होणार आहेत.

# मूर्तिजापूर वकील संघाच्या अध्यक्ष पदी ॲड.सुनील कांबे यांची अविरोध निवड

.■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■

दि. १६/०१/२०२५ मूर्तिजापूर वकील संघाची निवडणूक पार पडली या मध्ये वरिष्ठ वकील सुनील रामदास कांबे यांची मूर्तिजापूर वकील संघाच्या अध्यक्ष पदी तर अँड. निलेश भ. सुसतकर यांची उपाध्यक्ष पदी व अँड.शदर शा. मेहरे यांची सचीवपदी म्हणून अविरोध निवड करण्यात आली,तिनही वकील सदस्यांना ईतर सर्व वकील सदस्यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या,,या मध्ये अँड. दिलीप देशमुख, अँड.चंद्रजित देशमुख अँड, जगनाथ गुल्हाने, अँड.गुल्हाने मॅडम, अँड. दिलीप नाईक (समादेशक अधीकारी गृह विभाग )अँड.राजकुमार वानखडे, अँड.सचीन वानखडे, अँड.प्रशांत भडांगे अँड.विनोद सोनटक्के,अँड.श्रद्धा गुल्हाने, अँड. प्रदीप पाटील अँड.त्रिपाठी अँड.भगत, अँड.गौरखेडे अँड. निलेश सुखसोहळे, अँड. पंकज जमाणिक व इतर सर्व सदस्यांनी एकमते त्यांची अविरोध निवड केली त्यांच्या वर शुभेच्छाचा वर्षाव केला. व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .या त्यांच्या निवडी बद्दल या सदस्यावर सर्व कडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## पातुर तालुक्यातील देऊळगाव ब्राह्मण येथे श्रीमदब भागवत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

### अवलिया श्री रंगनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आध्यात्मिक सोहळा

■पातुर,दि.१९ (प्रतिनिधी)■

पातुर तालुका प्रतिनिधी पातुर तालुक्यातील ग्राम देऊळगाव ब्राह्मण येथे अवलिया श्री रंगनाथ म हाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त श्रीमदब भागवत व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन संस्थान च्या वतीने करण्यात आले आहे यामध्ये दैनंदिन कार्यक्रम १८ जानेवारी २०२६ ते २५ जानेवारी २०२६ पर्यंत चालणाऱ्या सात दिवसीय सप्ताहाम ध्ये सकाळी पाच ते सहा काकडा,भागवत कथा १२.०० ते ४.००वाजता पर्यंत सायंकाळी ५:०० ते ६.०० हरिपाठ रात्री साडेआठ ते साडेदहा पर्यंतहरी कीर्तन अशा दैनंदिन कार्यक्रमाची रेलचेल असून दररोज रात्री साडेआठ ते साडे दहा या वेळेत हरी किर्तन राहणार आहे रविवार १८ जानेवारी २०२६ ला अटाळीचे हभप कैलास महाराज मोरखडे, १९ जानेवारी २०२६ सोमवारला योगेश महाराज पाचपोर वेदांत चार्य आडगाव, २० जानेवारी २०२६ मंगळवार ला ह भ प ज्ञानेश्वर आज मार्के पंचगव्हाण, २१ जानेवारी २०२६ बुधवारला ला ह भ प केशव महाराज मोरे म्हैसपूर, २२ जानेवारी २०२६ ला ह भ प किशोर महाराज काळे तामसी, २३ जानेवारी २०२६ ला ह भ प पंढरीनाथ महाराज दिघोळे जवळा, २४ जानेवारी २०२६ ला ह भ प अरुण महाराज घोराडे गाथा मूर्ती किनी सवळद, तर २५ जानेवारी २०२६ ला समारोपीय काल्याचे किर्तन ह भ प श्रीकांत महाराज पाटील देऊळगाव ब्राह्मण यांचे ११:०० वाजता राहील तर काल्याच्या कीर्तनानंतर १.००ते ४.०० वाजतापर्यंत महाप्रसाद राहील सदर आध्यात्मिक सोहळ्याला टाळकरी म्हणून पंचक्रोशीतील सर्व टाळकरी मंडळी उपस्थित राहतील सदर कीर्तनाच्या कार्यक्रमांमध्ये गायनाचार्य म्हणून तांदळी येथील ह भ प गजानन महाराज आखरे, ह भ प किशोर महाराज लढे, मृदंगाचार्य ह भ प ज्ञानेश्वर महाराज यादगिरे, दुपारी १.००ते ४.०० भागवत कथा वाचक व्यासपीठाचार्य ह भ प दशरथ महाराज अवचार रा देगाव तालुका बाळापूर जिल्हा अकोला राहणार आहेत.

# माँ चैतन्य मीरा यांच्या भागवत कथा प्रांगणाचे भक्तीभावात भूमिपूजन संपन्न

## गोरक्षण संस्थान येथे भव्य आयोजन

■अकोला,दि.१९ (प्रतिनिधी)■

श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृती प्रचार परिषद अकोला तथा श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान येथे दिनांक २५ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत नित्य दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत आयोजित भागवत प्रवचनकार माँ चैतन्य मीरा याच्या गोरक्षण संस्थान येथील कथा स्थळाचे सोमवारी मोठ्या भक्तिभावात भूमिपूजन करण्यात आले.गोरक्षण संस्थानचे अध्यक्ष दीपक भरतीया व भारतीय संस्कृती प्रचार परिषद अकोलाचे श्रीप्रकाश रुहाटीया यांनी कथास्थळी पुरोहितांच्या वैदिक मंत्रोच्चारात पूजाविधीत सहभाग घेत जमिनीवर कुडाळ चालून रीतसर भूमिपूजन केले. यावेळी उपस्थित भागवत आयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कथास्थळाचे कुडाळ चालून भूमिपूजन केले. यानंतर रीतसर मंडप उभारणीस प्रारंभ करण्यात आला आहे. पूजा विधि पंडित सुदर्शन शर्मा, पंडित देवेंद्र आर्दीनी पार पाडला.गोमातेच्या सानिध्यात आयोजन समितीच्या वतीने भाविकांना कथा ऐकण्याची पर्वणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.या भागवत कथा श्रवणाचा महिला पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन दीपक भरतीया, श्रीप्रकाश रुहाटीया, महेश खंडेलवाल,राजीव बजाज, सुशील खोवाल,संजय अग्रवाल, शैलेंद्र कागलीवाल, सीए बीएम अग्रवाल, शंकर सेठ,किशोर अग्रवाल, पन्नालाल भूतडा, विक्रम गोयनका, संजय तुलशान, गोपाल एस अग्रवाल, अशोक अग्रवाल, सुरेश खंडेलवाल, सुरेश सुरेका,प्रकाश बजाज, प्रेमप्रकाश खेमका, शंकरलाल बियाणी आदि उपस्थित होते.



## निधन वार्ता

### विजय बाळापूरे



**अकोला** : तेल्हारा तालुक्यातील पाथर्डी येथील प्रतिष्ठित शेतकरी विजय मधुकरराव बाळापूरे (ह.मु. अकोला) यांचे शुक्रवार १६ जानेवारी रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ६९ वर्षांचे होते. त्यांचेवर मुळगाव पाथर्डी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे मुलगा भूषण, स्नुषा, तीन भाऊ, दोन बहिणी असा मोठा आप्त परिवार आहे.

**तेल्हारा** : पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या दहिगाव अवताडे शेत शिवारात सोमवार १२ जानेवारीच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्याने विद्युत मीटर पेटीतील साहित्य चोरून नेली.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Husband Passport No is (H0879024)
---OLD NAME---
ZARINA AMIN MOHAMMAD DAUD AMIN
----NEW NAME----
ZARINA PARVEEN MOHAMMAD DAOUD AMIN
My Residential Address is :- Shahjahan Road Dr ishaque chawal Mominpura Akola Maharashtra 444001.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Wife Passport No is **(S5109297)**
From --
**VIJAYPRAKASH SHALIGRAM PATIL**
--TO--
**UDAYPRAKASH SHALIGRAM PATIL**
My Residential Address is -- Near kotak Mahindra Bank Prakash Bag Shivani sub District Akola
District Akola 444104

# मध्यस्थी सारख्या उपक्रमातून समाजाला दिशा मिळते! :ॲड. रविंद्रभैया पाटील

## पंजाबराव राऊत यांना 'सोयरिक सेवा सन्मान' प्रदान

■अकोट,दि.१९ (प्रतिनिधी)■

'मुला-मुलींचे विवाह जुळवण्यासाठी मध्यस्थी मंडळाने राबवलेले उपक्रम हे निष्काम सेवेचा एक आदर्श आहे. काळाची गरज ओळखून या मंडळाने तयार केलेली 'विवाह आचारसंहिता' समाजाला नवी दिशा देणारी ठरेल,' असे प्रतिपादन श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगरचे अध्यक्ष ॲड. रविंद्र उपाख्य भैय्यासाहेब पाटील यांनी श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था अंतर्गत कार्यरत 'मध्यस्थी मंडळाच्या' वधू-वर परिचय पुस्तिकेच्या १३ व्या वार्षिकांकाचा प्रकाशन सोहळा अकोट येथे संपन्न झाला. त्याप्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले होते, तर ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर व दर्यापूरचे दिनकरराव गायगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

जळगाव खानदेशात लवकरच मध्यस्थी शाखा

आपल्या भाषणात भैय्यासाहेब पाटील पुढे म्हणाले की, 'आजचा काळ झपाट्याने बदलत आहे. अनिष्ट रूढी-परंपरा पाहता समाजाच्या प्रगतीसाठी गंभीर चिंतनाची गरज आहे. मध्यस्थी मंडळाने मांडलेली आचारसंहिता समाजबांधवांनी स्वीकारून आदर्श विवाह करावेत.' तसेच, या कार्याचा विस्तार करण्यासाठी जळगाव खानदेश येथे लवकरच शाखा स्थापन करण्याची ग्वाही त्यांनी दिली.यावेळी नानासाहेब हिंगणकर व वासुदेवराव महल्ले यांनी मार्गदर्शन केले.

पंजाबराव राऊत सोयरिक सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानितसमाजातील मुला मुलींचे विवाह योग जुळवून आणण्यासाठी निष्कामपणे कार्य करणाऱ्या सेवाव्रतींना मध्यस्थी मंडळाच्या वतीने ' श्री संत वासुदेव महाराज राज्यस्तरीय सोयरिक सेवा सन्मान' देऊन गौरविण्यात येते. वर्ष २०२६ चा हा मानाचा पुरस्कार कारंजा लाड येथील पंजाबराव विश्वनाथ राऊत यांना भैयासाहेब पाटील यांच्या हस्ते सपत्नीक प्रदान करण्यात आला. तसेच, पुस्तिकेचे मुद्रक नवनीत जवंजाळ यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी 'धन्य आजि दिन, झाले संत दर्शन' या अभंगाने केली. तत्पूर्वी वारकरी दिंडीने अतिथी चे भावपूर्ण स्वागत करण्यात आले.गायक गिरीश काळे यांनी स्वागत गीत, तर सौ. वर्षा मानकर यांनी मध्यस्थी गीत सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव सुरेशदादा कराळे यांनी केले. तर संपादकीय मनोगत मुख्य संपादक नंदकिशोर हिंगणकर यांनी व्यक्त केले.अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे यांनी मध्यस्थीच्या कार्याचा आढावा घेतला.विवाहआचारसंहिता सादरीकरण राममूर्ती वालसिंगे यांनी केले.पुरस्कार प्राप्त पंजाबराव राऊत यांचा कार्यात्मक परिचय प्रविण कानकिरड यांनी करुन दिला.सौ. ज्योतीताई कुकडे यांनी संचालन केले, तर कोषाध्यक्ष जयकृष्ण वाकोडे यांनी आभार मानले.पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली.या सोहळ्याला बुलढाणा, आणि अकोला येथील शाखाध्यक्ष अनुक्रमे अमृतराव वाघ, महादेवराव सावरकर, बाळकृष्ण आमले, समाधानराव उपाध्ये,ज्ञानदेवराव वनारे, रामेश्वर सपकाळ,संस्थेचे उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, सदस्य तथा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.






RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# : मतदारांची उदासीनता : लोकशाही कागदावर उरेल.. आत्मा हरवून बसेल!

लोकशाहीच्या इतिहासात स्वातंत्र्य आणि मतदानाचा अधिकार हे दोन अत्यंत मूलभूत टप्पे मानले जातात. मात्र जगातील बहुतांश देशांच्या बाबतीत हे दोन्ही अधिकार एकाच वेळी, सर्व नागरिकांना समान स्वरूपात मिळालेले दिसून येत नाहीत. अनेक राष्ट्रांनी आधी स्वातंत्र्य मिळवले; त्यानंतर दीर्घ सामाजिक संघषार्तून पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला आणि महिलांना तर अनेक दशकांची प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे जागतिक लोकशाहीचा प्रवास हा केवळ घटनात्मक तरतुदींचा नव्हे, तर सामाजिक चळवळी, सुधारणा आणि जनआंदोलनांचा परिणाम राहिला आहे.

--------------

या पार्श्वभूमीवर भारताचे उदाहरण विशेष महत्त्वाचे ठरते. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि अवघ्या तीन वर्षांत, म्हणजेच १९५० मध्ये लागू झालेल्या भारतीय संविधानाने महिला व पुरुष दोघांनाही एकाच वेळी सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार बहाल केला.

अमेरिका, ब्रिटन, फ्रान्ससारख्या तथाकथित प्रगत लोकशाही देशांच्या तुलनेत भारताने महिलांना मतदानाचा अधिकार फार लवकर दिला. हा निर्णय भारतीय लोकशाहीच्या वैचारिक परिपक्वतेचा आणि समताधिष्ठित दृष्टिकोनाचा स्पष्ट पुरावा आहे.

मात्र प्रश्न असा आहे की, एवढ्या संघर्षातून मिळालेल्या या अधिकाराचे आपण आज कितपत मोल जाणतो? महाराष्ट्रात १५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या २९ महानगरपालिका निवडणुकीत एकूण मतदानाची सरासरी टक्केवारी सुमारे ५४.७ % - ५५ % इतकी होती.

ही अधिकृत स्वरूपात संपूर्ण राज्यातील महानगरपालिकांचा एकत्रित मतदान टक्का आहे. म्हणजेच ४५ टक्के नागरिकांनी आपला मूलभूत लोकशाही अधिकार वापरणे टाळले. ही बाब केवळ आकडेवारीपुरती मर्यादित न राहता, भारतीय लोकशाहीसमोरील एक गंभीर सामाजिक, राजकीय प्रश्न बनली आहे.

लोकशाही व्यवस्थेत मतदान हा केवळ अधिकार नसून तो एक जबाबदार नागरिक म्हणून पार पाडायचे कर्तव्य आहे. संविधानाने मतदानाचा अधिकार दिला असला, तरी तो वापरण्याची जाणीव नागरिकांमध्ये नसेल, तर लोकशाहीचा उत्सव हळूहळू औपचारिकतेपुरता मर्यादित होण्याचा धोका निर्माण होतो. दुर्दैवाने, अलीकडील विधानसभा, लोकसभा आणि आता महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी सातत्याने घसरताना दिसते.

विशेषतः शहरी भागातील मतदारांचा सहभाग हा ग्रामीण भागाच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी असल्याचे वास्तव आहे. शहरातील मतदार हा तुलनेने सुशिक्षित, माहितीपूर्ण आणि राजकीय घडामोडी समजून घेण्यास सक्षम असतो. मात्र, हाच मतदार जर निवडणूक प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होत नसेल, तर लोकशाहीचा प्रवास कोणत्या दिशेने जाईल, याचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक ठरते.

लोकशाही ही केवळ मतदानाच्या दिवशी उभी राहत नाही; ती नागरिकांच्या सातत्यपूर्ण सहभागावर टिकून असते.

मतदानाच्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या घटकांचा अभ्यास केला असता एक महत्त्वाची बाब प्रकर्षाने समोर येते. दलित, मुस्लिम, झोपडपट्टीतील रहिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक मोठ्या प्रमाणावर मतदान करताना दिसतात.

याउलट, स्वतःला व्हाईट कॉलर वर्गात मोजणारा, आर्थिकदृष्ट्या सधन आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावी मानणारा वर्ग अनेकदा मतदानापासून दूर राहतो. चौकाचौकात राजकारणावर चर्चा करणारा, टीका-टिप्पणी करणारा हा वर्ग प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मात्र अनुपस्थित राहतो. ही विसंगती लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
9326788849

या संदर्भात अमरावती महानगरपालिकेचे उदाहरण अधिक बोलके ठरते. २०२६ च्या निवडणुकीत शहरातील मुख्य वसाहती असलेल्या प्रभाग क्रमांक १, ८, १२, १३, १७, १८, १९ आणि २० या प्रभागांमध्ये मतदानाची टक्केवारी केवळ ४६ ते ४८ टक्क्यांदरम्यान राहिली.

हे प्रभाग शहराचे मध्यवर्ती व तुलनेने सुशिक्षित आणि सधन भाग मानले जातात. अशा भागांतील नगण्य मतदान हे सुशिक्षित मतदार मतदानापासून दूर पळतो आहे या वास्तवाकडे बोट दाखवते.

या उदासीनतेमागे अनेक कारणे असू शकतात. निवडणूक यंत्रणेचे धोरण व नियोजन, पक्षफुटीनंतर घडलेल्या काही अप्रिय राजकीय घटना, तसेच अस्थिरता ही त्यामागची काही प्रमुख कारणे ठरू शकतात.

यासोबतच तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर रोजगारासाठी मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये स्थलांतरित झालेली आहे. मतदार यादीत नावे असूनही मतदानासाठी गावी किंवा मूळ शहरात येणे त्यांना शक्य होत नाही, किंवा सध्याच्या राजकीय वातावरणाबद्दल असलेल्या नाराजीमुळे येण्याची इच्छा होत नाही, हेही वास्तव नाकारता येत नाही.

सर्व कामगार व कर्मचाऱ्यांना शासकीय सुट्टी जाहीर करूनही मतदानाची टक्केवारी जर ४६ ते ५२ टक्क्यांच्या पुढे जात नसेल, तर याचा अर्थ सुशिक्षित मतदारांच्या मनात मतदान करूनही काहीच बदलत नाही, अशी भावना खोलवर रुजलेली आहे.

आजचे राजकारण प्रचंड गढूळ झाले आहे, अशी सर्वसामान्य धारणा बनली आहे. निवडून आलेला प्रतिनिधी कोणत्या पक्षात राहील, कोणाच्या हितासाठी काम करेल, याची कोणतीही शाश्वती उरलेली नाही. पाच वर्षांत वॉर्डात न फिरकणारे नगरसेवक, नागरिकांच्या अनुभवातून तयार झालेली निराशा अधिक तीव्र करत आहेत.

प्रभाग पद्धतीतील चार नगरसेवकांची रचना ही जबाबदारीच्या दृष्टीने अधिक गोंधळ निर्माण करणारी ठरत आहे. कोण कोणत्या कॉलनीसाठी जबाबदार, प्रश्न कुणाला विचारायचा, उत्तरदायित्व कोण स्वीकारणार, हे प्रश्न मतदारांसमोर अनुत्तरितच राहतात. शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करून मतदान जनजागृती केली जाते; मात्र मतदानाची टक्केवारी जैसे थे राहते, ही बाब आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित करते.

या संपूर्ण परिस्थितीसाठी केवळ मतदारांनाच दोष देऊन चालणार नाही. सर्व राजकीय पक्ष, दलबदलू नेते, अमाप पैसा खर्च करून निवडणुका लढवणारे उमेदवार आणि पैशाच्या जोरावर तिकीट देणारी पक्षसंस्कृती याला तितकीच जबाबदार आहे.

तिकीट मिळवण्यासाठी आणि मिळाल्यानंतर मजूर वर्गाला रोजंदारीवर रॅलीत आणण्याची प्रथा राजकारणातील मूल्यांची अधोगती दर्शवते. जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये आणि सत्ताकेंद्री भूमिका पाहून सुशिक्षित मतदार या गलिच्छ राजकारणाला कंटाळलेला आहे.

आजच्या राजकारणात सर्वसामान्य माणूस नव्हे, तर राजकीय वरदहस्त आणि पैसा फेकणारेच टिकतात, ही भावना बळावत चालली आहे. त्यामुळे अनेक सुशिक्षित नागरिक आपलं काम, आपलं कुटुंब यामध्येच समाधान मानू लागले आहेत. हेच वास्तव शहरी भागातील कमी मतदानामागे दडलेले दिसते.

तरीही, लोकशाही टिकवायची असेल तर ही उदासीनता परवडणारी नाही. सुशिक्षित मतदारांनी मतदानापासून दूर राहणे म्हणजे लोकशाहीच्या बळकटीकरणाऐवजी तिच्या दुर्बलतेला खतपाणी घालणे होय. म्हणूनच, मतदान हा केवळ अधिकार नसून तो सामाजिक बांधिलकीचा भाग आहे, ही जाणीव पुन्हा एकदा रुजवण्याची गरज आहे. अन्यथा, लोकशाही केवळ कागदावर उरेल आणि तिचा आत्मा हरवून बसेल.

तेव्हा लोकशाही टिकवायची असेल तर मतदान न करण्याची ही उदासीनता परवडणारी नाही. सुशिक्षित मतदारांनी मतदानापासून दूर राहणे म्हणजे लोकशाहीच्या बळकटीकरणाऐवजी तिच्या दुर्बलतेला खतपाणी घालणे होय. मतदान हा केवळ अधिकार नसून तो सामाजिक बांधिलकीचा भाग आहे, ही जाणीव पुन्हा एकदा रुजवण्याची गरज आहे. अन्यथा, लोकशाही केवळ कागदावर उरेल आणि तिचा आत्मा हरवून बसेल हे निश्चित !

# : महाराणा प्रताप : सामाजिक कार्याची अमर परंपरा

(कालच्या अंकावरून पुढे)

------------------------

स्त्री ही समाजाची आधारस्तंभ आहे, तिचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान आहे, ही भावना त्यांच्या धोरणांतून आणि कृतीतून स्पष्टपणे व्यक्त होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही भूमिका स्त्री-सन्मान आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

महाराणा प्रताप यांनी शिक्षण, संस्कार आणि सांस्कृतिक परंपरा यांना देखील महत्त्व दिले.

त्यांनी आपल्या कुटुंबात आणि सहकाऱ्यांमध्ये शौर्याबरोबरच नीतिमूल्ये, समाजनिष्ठा आणि देशभक्तीचे संस्कार रुजवले. त्यांच्या पुत्र महाराणा अमरसिंह यांच्यात दिसणारी स्वाभिमानाची, लोककल्याणाची आणि संघर्षशीलतेची भावना ही महाराणा प्रताप यांच्या संस्कारांचीच देणगी होती. सामाजिक नेतृत्वाची ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली आणि मेवाडच्या स्वाभिमानाची ज्योत अखंड प्रज्वलित राहिली.

महाराणा प्रताप यांचे सामाजिक कार्य केवळ मेवाडपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या संघषार्मुळे संपूर्ण भारतीय समाजाला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचे महत्त्व पटले. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, पराभव न मानण्याचा आणि समाजहित सर्वोच्च मानण्याचा मार्ग होता. त्यामुळे महाराणा प्रताप हे केवळ इतिहासातील योद्धे न राहता लोकनायक ठरले. त्यांच्या जीवनकथेतून समाजाला संघर्षाची दिशा आणि मूल्यांची जाणीव मिळाली.

आजच्या काळात महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांचे सामाजिक विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही समाज आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय, सांस्कृतिक आक्रमण आणि नैतिक अधःपतनाला सामोरे जात आहे. अशा वेळी महाराणा प्रताप यांचे जीवनकार्य आपल्याला मूल्यांवर आधारित संघर्षाची प्रेरणा देते.

त्यांनी शिकवले की खरा पराभव हा तलवारीने नव्हे, तर आत्मसन्मान गमावल्याने होतो. समाजासाठी जगणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि मूल्यांशी तडजोड न करणे, हा त्यांचा वारसा आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक जबाबदारीची, त्यागाची आणि लोककल्याणाची जिवंत गाथा होती. त्यांनी सत्ता, संपत्ती आणि वैभवापेक्षा समाजाचे हित मोठे मानले. त्यांच्या त्यागातून आणि संघषार्तून समाजाला स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला. म्हणूनच महाराणा प्रताप यांचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून सामाजिक मूल्यांची पुनःप्रतिष्ठा होय.

स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांना अभिवादन करताना आपण त्यांच्या जीवनातून स्वाभिमान, सामाजिक न्याय, समता, स्वावलंबन आणि लोककल्याणाची प्रेरणा घ्यायला हवी. महाराणा प्रताप हे तलवारीपेक्षा मूल्यांवर विश्वास ठेवणारे, समाजासाठी जगणारे आणि इतिहासाला दिशा देणारे महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांची आणि कार्याची उज्ज्वल परंपरा जपणे, हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

■ ■ ■

# शिवचरित्रातून राष्ट्र उभारणी : डॉ. शिवरत्न शेटे




१९६१ साली कोकण जिंकायला निघालेल्या शाहिस्तेखानाचा उजवा हात कारतलब खान याच्या १८,००० सैन्यांना शिवाजी महाराजांच्या मावळ्यांनी उंबरखिंडीच्या अरुंद दरीत अडकविले. दोन्ही बाजूंनी सैन्याची कोंडी करत, गनिमी काव्याचे तंत्र वापरीत, घोड्यावर स्वार असलेल्या शिवाजी महाराजांनी ही लढाई अवघ्या दोन तासांत जिंकली. कारतलब खान शिवाजी महाराजांना शरण आला आणि सैन्य सोडून निघून गेला.

जिथे शाहिस्तेखान तळ ठोकून बसला होता, अशा लाल महालात केवळ ४०० मावळ्यांसह शिवाजी महाराजांनी छापा टाकला. त्याची मुंडकी छाटणार, पण त्याने उडी मारल्याने त्याची बोटे कापली गेली. ही घटना मुघल साम्राज्यासाठी मोठी नाचक्की होती.

अशा अनेक युद्धांमध्ये आपल्या शौर्याची पराकाष्ठा दाखविणारे, हिंदवी स्वराज्यासाठी, रयतेच्या सुखासाठी ज्यांची तलवार तळपत होती, रक्त सळसळत होते असे तेजस्वी, प्रखर स्वाभिमानी, पराकोटीची लढाऊ वृत्ती असलेले शिवाजी महाराज मात्र पुरंदरचा तह झाल्यानंतर सर्वस्व गमावून बसतात. २३ किल्ले त्यांना मुघलांना द्यावे लागतात, मोठ्या प्रमाणात महसूल द्यावा लागतो. स्वतःचा नऊ वर्षांचा पुत्र संभाजीला दिलेरखानाच्या छावणीत तारण म्हणून ठेवावे लागते.

घोड्यावर थाटात मिरवणारे, पालखीत मानाने बसणारे महाराज तहाच्या अटीनुसार निःशस्त्र पायी चालत निघतात. एवढी नामुष्कीची वेळ येऊनही त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार शिवतसुद्धा येत नाही. त्यांच्या मनात विचार असतो तो फक्त जिंकण्याचा. किल्ले पुन्हा जिंकता येतील, पण गेलेली माणसे परत मिळवता येणार नाहीत. आणि त्यानंतर अवघ्या तीन वर्षांत त्यांनी पुन्हा गतवैभव प्राप्त केले आणि २४० किल्ल्यांचे ते गडपती होतात.

आपल्या खणखणत्या आवाजात, हजारो शिवभक्तांचे रक्त सळसळायला लावणाऱ्या प्रभावी व चिकित्सक वक्तृत्वशैलीतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातील एकेक प्रसंग जसाच्या तसा, समग्र पद्धतीने उभा करीत शिवाजी महाराजांची जाज्वल्य देशभक्ती, प्रखर धर्माभिमान, त्यांची युद्धनीती, प्रशासकीय धोरण, धीरोदात्त स्वभाव, माणसांना जोडण्याची कला, पर्यावरणप्रेम या गुणांची ओळखच नव्हे तर ही मूल्ये रुजवून राष्ट्र उभारणीचे मोठे कार्य आयुर्वेदिक चिकित्सक, योगतज्ज्ञ, हिंदी परिवाराचे संस्थापक डॉ. शिवरत्न शेटे देशभरात करीत आहेत.

संस्कारक्षम वयामध्ये शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांचा पहाडी आवाज, ह्यगड आला पण सिंह गेलाह्न यांसारखे अतुल्य पराक्रमाची चेतना निर्माण करणारे कार्यक्रम पाहिल्यानंतर शिवाजी महाराजांविषयी डॉ. शिवरत्न शेटे यांच्या मनामध्ये विलक्षण ओढ निर्माण झाली. उपजत असलेल्या पहाडी आवाजात त्यांनी पोवाडे गाण्यास सुरुवात केली.

सोबतच शालेय जीवनात असतानाच त्यांनी अनेक वक्तृत्व स्पर्धा गाजविल्या आणि किल्ले भ्रमंतीही सोबतच होती. या त्रिवेणी संगमातून शिवचरित्र त्यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने भिनले. ते मोठ्या अभिमानाने सांगतात–जन्म कुठे घ्यायचा हे आपल्या हाती नसते, पण अनेक राज्ये असलेल्या भारतासारख्या देशात शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात जन्म व्हावा, ही मोठी पुण्याची गोष्ट आहे.

ज्या मातीमध्ये शिवाजी महाराजांचा जन्म झाला, ती माती कपाळाला लावण्याऐवजी माथी भडकवणारी वक्तव्ये आज होत आहेत. आज लहान मुलांपासून वृद्ध स्त्रियांपर्यंत सर्वच स्त्रिया असुरक्षित आहेत. त्यांच्यावर अत्याचार होत आहेत. नात्यातील स्नेहभाव नष्ट होत आहे. पक्षनिष्ठा उरलेली नाही. तेव्हा देशाभिमान आणि धर्मसंस्कृतीचे रक्षण करून तरुणांची पिढी निर्माण केली पाहिजे, या एकाच प्रेरणेने डॉ. शिवरत्न शेटे अव्वल संदर्भ देत शिवचरित्र जनमानसात उतरवीत आहेत.

आपल्या व्याख्यानांतून ते सांगतात की धर्माविषयी प्रखर अभिमान बाळगणारे शिवाजी महाराज तेवढेच इतरांच्या धर्माविषयी संवेदनशीलही होते. आपल्या मृत्यूनंतर आपल्या कुटुंबाची पूर्ण जबाबदारी महाराज घेतील, ही निष्ठा त्यांच्या मावळ्यांमध्ये होती आणि त्यामुळेच ते महाराजांसाठी प्रसंगी प्राण द्यायलाही तयार होत.

त्यांचे स्त्री-दक्षिण्य, तसेच आपल्या मावळ्यांनी केलेल्या पराक्रमाची योग्य दखल घेण्याची पद्धत–अशा शिवाजी महाराजांच्या अनेक प्रसंगांची उदाहरणे ते प्रभावीपणे देतातच, पण समोर बसलेल्या प्रत्येक शिवभक्ताच्या रक्तामध्ये स्फुरणही निर्माण करतात. यातून अनेक तरुणांना प्रेरणा व चेतना मिळाली असून ते त्यांच्या विचारांशी जोडले गेले आहेत.

याशिवाय शिवाजी महाराजांचा प्रत्येक गड-किल्ला हा आपल्या दृष्टीने तीर्थस्थळच असतो. हे गडकिल्ले म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे साक्षीदार आहेत. हिंदवी परिवार संस्थेच्या माध्यमातून तीन दशकांपासून ऊन, पाऊस, वारा याची कशाचीही तमा न बाळगता शालेय विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत गडभ्रमंती केली जात आहे.

या गडभ्रमंतीमध्ये राजीव खांडेकर, पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह अनेक दिग्गज सहभागी झाले असून, पुस्तकातून शिवाजी महाराज समजावून सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभवातून शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा शिवभक्तांपर्यंत पोहोचवली जाते.



एक व्यक्ती आपल्या अल्प आयुष्यात काय काय करू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण असलेल्या डॉ. शिवरत्न शेटे यांनी आयुर्वेद या भारतीय प्राचीन वैद्यकशास्त्रातील पदव्युत्तर पदवी तसेच इतिहास विषयातील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे.

प्राचीन भारतीय परंपरेतील आणि आज संपूर्ण विश्वाने स्वीकारलेला योग हा देखील त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. या विषयातही अभ्यास करून त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. या प्रत्येक ज्ञानशाखेतील सर्वोत्तम गोष्टी ते आपल्या भोवतालच्या प्रत्येकाला अतिशय मनापासून देत आहेत. सोलापूरमधील शिवसह्याद्री आरोग्यधाम हा त्यांचा आगळावेगळा प्रयोग आहे. या प्रयोगातून महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या सह्याद्री इतकीच त्यांच्या मनाची विशालताही दिसून येते.

शिवरायांचा देव, देश आणि धर्म ही त्रिसूत्री त्यांनी प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरवली आहे. शिवसह्याद्री आरोग्यधाममध्ये देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांच्या कुटुंबीयांना सर्व सुविधा निशुल्क उपलब्ध करून दिल्या जातात. देशाच्या अनेक भागांतून दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्ण येथे पूर्णपणे बरे झाले आहेत.

याचबरोबर महाराष्ट्र आणि कर्नाटकातील हजारो रुग्णांना ते विनामूल्य चिकित्सा तसेच आयुर्वेदिक औषधेही देत आहेत. त्यांच्या या उपचारात्मक सेवेचा लाभ असंख्य रुग्ण घेत आहेत.

एक इतिहास अभ्यासक, उत्तम वक्ता, आयुर्वेदशास्त्राचा गाढा अभ्यासक, योगशास्त्राचा पथिक अशा विविध भूमिकांमध्ये वावरताना त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ता सतत सजग असतो. काही वर्षांपूर्वी कोल्हापूर आणि सांगली भागात आलेल्या महापुराच्या काळात त्यांनी आपल्या शिलेदारांसह धाव घेतली आणि अवघ्या सात दिवसांत २६ आरोग्य शिबिरे घेतली. गरजूंना सुमारे १५ लाखांची औषधे विनामूल्य वितरित केली.

त्यांच्या जाणीवा किती प्रगल्भ आहेत, हेच यातून स्पष्ट होते. या क्षेत्रातील कर्तृत्वामुळेच केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाने उभ्या भारतातून निवडलेल्या चार तज्ज्ञांमध्ये सन्मानपूर्वक त्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. डॉ. शिवरत्न शेटे हे आपल्या कार्यकर्तृत्वामुळे स्वामी विवेकानंद पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. याशिवाय अनेक पुरस्कार व मानसन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

ते सांगतात की शिवाजी महाराजांना आपण पाहिले नाही, पण त्यांच्या शौर्याची गाथा सांगणारे, त्यांच्या दुर्दम्य साहसाचे प्रत्यक्ष साक्षीदार हे गडकोट व किल्ले आहेत. आज त्यांची पडझड होत आहे. त्यामुळे शासनाने शिवाजी महाराजांचा इतिहास नव्या पिढीसमोर ज्वलंत उभा करण्यासाठी या गड, किल्ले व परकोटांची उभारणी करण्याची गरज आहे.

ते म्हणतात की शिवाजी महाराजांचा इतिहास म्हणजे आरमार, जलतज्ज्ञता, पर्यावरण, सहिष्णुता, धर्माभिमान, प्रशासकीय धोरण, मानव संसाधन तंत्र शिकविणारे व्यक्तिमत्त्व विकासाचे पुस्तकच आहे. त्यामुळे नव्या पिढीने त्यांच्या विचारांचे आचरण करावे, असा मोलाचा सल्ला ते देतात.

शिवचरित्रातून राष्ट्रउभारणीचे मोठे कार्य त्यांच्या हातून घडत आहे. त्यांचे हे चिरंतन कार्य अखंड सुरू राहो, यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

---------------

डॉ. शिवरत्न शेटे संपर्क क्रमांक
9890267026

## एकगठ्ठा मतांची दिशा आणि हिंदूंची दशा

वाचक लिहितात

धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली हिंदूंवर अन्याय करून मुसलमानांचे लांगूनचालन करणाऱ्या पक्षांची आज अवस्था किती बिकट आणि दयनीय झाली आहे याचा प्रत्यय नुकताच राज्यात झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत दिसून आला. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांपासून ते ग्रामपंचायत मध्ये स्थानिक नागरिकांची मानसिकता दिसून येते.

लोकसभेच्या निवडणुकीत मध्ये मुसलमानांनी हिंदुत्वाच्या विरोधातील प्रभावी पक्ष म्हणून काँग्रेसच्या बाजूने मतदान केले. महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत देखील महायुतीच्या विरोधातील प्रबळ पक्ष म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार या पक्षांना बळ दिले परंतु महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मात्र कुणा एका पक्षाच्या पारड्यात मते न देता हिंदूनिष्ठ पक्षांच्या विरोधातील उमेदवारांना मतदान केल्याचे दिसून येते. वर्ष 2017 मध्ये 56 नगरसेवक असलेल्या ए. एम. आय. एम. चे या निवडणुकीत 125 नगरसेवक निवडून आले आहेत.

ए.एम.आय.एम. सह महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनीही मुसलमान बहुल भागांमध्ये मुसलमान उमेदवार उभे केले त्यामुळे 2017 च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्व पक्षांचे मिळून साधारणपणे 129 मुसलमान उमेदवार निवडून आले होते. 2026 च्या निवडणुकीत ही संख्या दोनशेच्या वर गेली आहे. एक गठ्ठा मतांनीच हे उमेदवार निवडून आले आहे.

भारतात निवडणुका या भावनात्मक सूत्रावर अधिक होतात त्यामुळे ज्या समाजाचा उमेदवार असेल त्या समाजाची मते त्या उमेदवाराला जाण्याची शक्यता अधिक असते. धर्मनिरपेक्ष देशात लोकशाही मार्गाने मुसलमान उमेदवार निवडून येणे किंवा सत्तेमध्ये येणे हे काही राज्यघटनेच्या विरोधात नाही. हे लोक राज्यघटनेला मानतील याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही. यांचे मतदान धर्मासाठी होत असते हिंदू मात्र मतदान करण्यासाठी तेवढ्या प्रमाणात उत्साही दिसत नाही त्यामुळे मुसलमानांच्या मतांची टक्केवारी वाढत आहे. हिंदूनिष्ठ पक्ष सत्तेत येणे आणि राजकारण हिंदुत्वाला केंद्रभूत होणे या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. राजकारणामध्ये हिंदुत्वाचा अर्थात हिंदू संस्कृती, सनातन संस्कृती केंद्रभूत करण्याचा टप्पा अद्यापही गाठायचा आहे. हिंदूंमधील मतदानाच्या उदासीनते विषयी हिंदूनिष्ठ पक्ष आणि हिंदू समाज या दोघांनाही चिंतन करणे आवश्यक आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

# कवी उत्तम मुळे आणि दलित सांस्कृतिक चळवळ

## उपेक्षित प्रतिभेचा शाहीर


महाराष्ट्राच्या दलित साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीच्या इतिहासात अनेक तेजस्वी पण उपेक्षित नावं आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचं, मात्र दुर्दैवाने दुर्लक्षित राहिलेलं नाव म्हणजे कवी उत्तम मुळे.

बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजजागृतीसाठी आयुष्य वेचणारे उत्तम मुळे हे केवळ कवी नव्हते, तर ते एक शाहीर, विचारवंत आणि परिवर्तनाचा आवाज होते.

१९३६ साली बुलढाणा जिल्ह्यात जन्मलेल्या उत्तम मुळे यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षमय होता. विश्वकर्मा/बेलदार समाजात जन्म असूनही त्यांनी जात, धर्म आणि सामाजिक बंधनांच्या पलीकडे जाऊन बुद्ध, धम्म आणि मानवतेचे विचार आपल्या काव्यातून मांडले.

१९५५ साली नागपूर येथे त्यांनी प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट घेतली. ही भेट त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली.

बाबासाहेबांच्या विचारांनी भारावून जाऊन त्यांनी आपली लेखणी पूर्णतः सामाजिक परिवर्तनासाठी वाहिली. "ये बुद्ध की धरती युद्ध न चाहे चाहे अमन ..." हे बुद्ध का भारत, प्रबुद्ध भारत सारखी गीतं आजही भीमगीतांच्या आणि बुद्धगीतांच्या मंचावर ऐकू येतात. ही गीतं केवळ मनोरंजन करणारी नसून ती शोषित - वंचितांच्या आत्मसन्मानाची घोषणा होती.



सत्य, करुणा, समता आणि बंधुतेचा संदेश त्यांनी अत्यंत साध्या पण परिणामकारक शब्दांत दिला. त्यांच्या गीतांनी अनेक गायकांना प्रसिद्धी आणि आर्थिक लाभ मिळवून दिला; मात्र दुर्दैवाने, या गीतांचा मूळ सर्जक शेवटपर्यंत दारिद्र्य आणि उपेक्षेचे जीवन जगत राहिला.

२०११ साली उत्तम मुळे यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने दलित सांस्कृतिक चळवळीचा एक प्रखर आवाज हरपला. दुर्दैवाची बाब म्हणजे भारत सरकार तर सोडाच, महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याची विशेष दखल घेतली नाही. उलटपक्षी, श्रीलंका सरकारने मात्र त्यांच्या बुद्धवादी साहित्याची दखल घेत त्यांचा गौरव केला, ही गोष्ट आपल्या व्यवस्थेच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उभं करते. आज उत्तम मुळे हे नाव वेगवेगळ्या संदर्भात–न्यायालयीन प्रकरणं, सोशल मीडिया वरील व्यक्ती, किंवा स्थानिक कामांच्या निविदांमध्ये–दिसून येतं. मात्र या सर्व गोंधळात मूळ कवी उत्तम मुळे यांची ओळख धूसर होत चालली आहे, ही बाब चिंताजनक आहे.

सामाजिक स्मृतीतून अशा व्यक्तींचं नाहीसं होणं म्हणजे चळवळीच्या इतिहासाचं नुकसान होय. उत्तम मुळे यांचे साहित्य हे केवळ काव्य नव्हे; ते संघषार्चं दस्तऐवजीकरण आहे. ते वाचलं, गायिलं आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवलं गेलं पाहिजे.

त्यांच्या नावाने पुरस्कार, अभ्यासक्रमात समावेश, किंवा स्मारक उभारणं ही केवळ सन्मानाची गोष्ट नाही, तर ती सांस्कृतिक जबाबदारी आहे.

आज त्यांच्या १५व्या स्मृतिदिनानिमित्त, कवी उत्तम मुळे यांना केवळ अभिवादन करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांची आणि साहित्याची मशाल पुढे नेण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण मानवतेचा हक्क मागणारा आवाज कधीही काळाच्या पडद्याआड जाऊ नये– तोच उत्तम मुळे यांना खरा आदरांजली ठरेल.



प्रमोद जांभूळकर
नागपूर.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### तर... ची वाढेल शान!

मनात येईल तेंव्हा
नेते युती तोडतात
मनात येईल तेंव्हा
'हे 'पक्ष बदलतात ..
मतदारांना काय हे
दावणीतील बैल
समजतात ?..

सहन करते जनता
म्हणून झाले सैराट
दाखव तुझा झटका
करत चल भुईसपाट ..

घटस्फोटीत पक्षाशी
पून्हा करती युती
जनमताची कदर नाही
का मत मागाया येती ?..

तुच तुझा उध्दारकर्ता
याचे सतत ठेव भान
मतदानाचा योग्य वापर कर
लोकशाहीची वाढेल शान . !

## क्रोमाचा धमाकेदार प्रजासत्ताक दिन सेल सुरू झाला आहे: ॲपल आणि सॅमसंगसारख्या प्रमुख ब्रँडवर आकर्षक ऑफर्स!

**नागपूर, १९ जानेवारी :** भारतातील सर्वात विश्वासार्ह ओम्नी-चॅनेल इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर क्रोमाने आपला प्रजासत्ताक दिन सेल जाहीर केला आहे. दरवर्षी ग्राहक या सेलची आतुरतेने वाट पाहत असतात. या सेलमध्ये स्मार्टफोन, लॅपटॉप, टेलिव्हिजन, मोठी उपकरणे आणि ऑडिओ उत्पादनांवर आकर्षक डील आणि ऑफर मिळतात. आता सर्व क्रोमा स्टोअर्समध्ये सेल सुरु झाला असून, २६ जानेवारीपर्यंत राहील.

क्रोमा स्टोअर्समध्ये खरेदी करणारे ग्राहक बँक कॅशबॅक, एक्सचेंज बोनस, विशेष विद्यार्थी किंमत आणि सोपे ईएमआय यांचे लाभ घेऊ शकतील, ज्यामुळे हा वर्षातील एक सर्वात मौल्यवान इलेक्ट्रॉनिक्स सेल बनेल. सर्व किंमती आणि ऑफर ब्रँड, मॉडेल, स्टोअर, दिवस, शहर आणि उपलब्धतेनुसार बदलू शकतात आणि त्यात सहभागी होत असलेल्या बँक किंवा वित्त भागीदाराच्या अटींच्या अधीन असतात. याव्यतिरिक्त, एचडीएफसी टाटा निओ कार्डधारक निवडक ॲपल उत्पादनांवर १०% पर्यंत बचत करू शकतात, ज्यामुळे या सीझनमधील ऑफर आणखी आकर्षक बनतील.

सध्या स्मार्टफोन क्षेत्रातील सर्वोत्तम ऑफर ॲपल डिव्हाइसवर मिळत आहेत. मूळ ८२,९०० किमतीचा आयफोन १७ आता क्रोमा प्रजासत्ताक दिनाच्या सेलमध्ये फक्त ४७,९९० ला खरेदी करता येईल.

इन्फिनिटी रिटेल लिमिटेडच्या प्रवक्त्याने सांगितले की, भारतीय कुटुंबांसाठी प्रजासत्ताक दिन हा एक खरेदीचा उत्तम दिवस असतो, यावेळी लोक त्यांच्या घरासाठी आणि वैयक्तिक वापरासाठी नवीन आणि अपग्रेडेड वस्तू खरेदी करण्यासाठी इच्छुक असतात. आमच्या प्रजासत्ताक दिनाच्या सेलमध्ये, आम्ही प्रत्येक श्रेणीमध्ये उत्तम ऑफर आणि डील सादर केल्या आहेत. आमचे उद्दिष्ट आमच्या ग्राहकांना योग्य किमतीत सर्वोत्तम उत्पादने आणि आमच्या स्टोअरमधील तज्ञांच्या मदतीने एक उत्तम खरेदी अनुभव प्रदान करणे आहे.

## आयडीबीआय बँक लिमिटेड :३१डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे वित्तीय निष्कर्श

**मुंबई, १९ जानेवारी :** आयडीबीआय बँके तर्फे त्यांच्या आर्थिक वर्ष २६च्या तिसऱ्या तिमाहीच्या आर्थिक निष्कर्शांची घोषणा करण्यात आली. आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा हा रु. १,९३५ कोटी झाला. एनआयएम हे ३.५२ टक्के होते. ठेवींचा खर्च हा २०२६च्या तिसऱ्या तिमाहीत ४.६२ टक्के झाला जो वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत हाच स्तर ४.६२ टक्के होता. सीआरएआर हा २४.६३ टक्के झाला वार्षिक तुलनेत ही वाढ २६५ बीपीएस आहे. रिटर्न ऑन सेट्स (आरओए) हे वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत १.८३ टक्के होती जी वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १.९९ टक्के होती. रिटर्न ऑन इक्विटी (आरओई) हे १४.४९ टक्के होती. निव्वळ एनपीए चे प्रमाण हे ३१ डिसेंबर २०२५ रोजी ०.१८ टक्के होते. निव्वळ एनपीए मध्ये सुधारणा झाली. ३१ डिसेंबर २०२५ रोजी हा स्तर २.५७ टक्के होता तर ३१डिसेंबर २०२४ रोजी ३.५७ टक्के होता, म्हणजेच १०० बीपीएस ने कमी झाला. पीसीआर हा ९९.३३ टक्के होता जो ३१ डिसेंबर २०२४ रोजी ९९.४७ टक्के होता.

## हिरव्या भविष्यासाठी सामूहिक जबाबदारीचा संदेश देण्यासाठी एव्होनिथ स्टीलकडून पहिल्यांदाच रन फॉर एन्व्हायर्नमेंटचे आयोजन

**नागपूर, १९ जानेवारी :** भारतातील आघाडीची स्टील उत्पादक कंपनी एव्होनिथ स्टीलने आज महाराष्ट्रातील वर्धा शहरात आंबेडकर चौक येथे द १० रन फॉर एन्व्हायर्नमेंट २०२६चे आयोजन केले. पर्यावरण संरक्षण आणि चांगल्या सार्वजनिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याचा हा उपक्रम होता. अधिकाधिक लोकांचा सहभाग मिळावा यासाठी ही मॅरेथॉन १० किमी आणि ५ किमी अशा दोन अंतरांत घेण्यात आली. वर्धा शहरातील विविध मार्गांवर ही शर्यत पार पडली असून तीन वेगवेगळ्या वयोगटांसाठी स्वतंत्र स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. या मॅरेथॉनमध्ये १६ वर्षांवरील ४,५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. रोजच्या छोट्या छोट्या सवयींमधून आपला पर्यावरणावर होणारा परिणाम कसा कमी करता येईल, याबाबत जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाला सहभागी धावपटूंनी आपला पाठिंबा दिला.



डॉ. पंकज भोयर, वर्धा आणि भंडारा जिल्ह्यांचे पालकमंत्री, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते आणि त्यांनी मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.

एव्होनिथ स्टीलच्या सर्व सहभागी धावपटूंनी तसेच प्रमुख व्यवस्थापन कर्मचाऱ्यांनी सेल्फी बूथवर हिरव्या भविष्यासाठीची शपथ घेऊन आपली बांधिलकी व्यक्त केली. ही शपथ सोशल मीडियावर शेअर करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचवण्यात आला. १० किमी आणि ५ किमी या दोन्ही शर्यतींसाठी तीन वेगवेगळ्या वयोगटांमध्ये रोख बक्षिसे आणि पदके देण्यात आली. तसेच, सर्व नोंदणीकृत सहभागी धावपटूंना सहभागाबद्दल गुणवत्तापत्र प्रदान करण्यात आले.

वर्धा येथे एव्होनिथ स्टीलचा लोहनिर्मिती तसेच तयार स्टील उत्पादनांचा उत्पादन प्रकल्प कार्यरत आहे. उपजीविका विकास, आरोग्यसेवा आणि ग्रामीण क्रीडा क्षेत्रात राबवण्यात येणाऱ्या लक्ष केंद्रीत उपक्रमांद्वारे एव्होनिथ स्टील समावेशक विकास आणि शाश्वत प्रगतीसाठी आपली बांधिलकी अधिक मजबूत करत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून ३० गावांमधील ग्रामीण भागातील ५०,००० हून अधिक नागरिकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवून आणला जात आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही सर्व भागधारकांची सामूहिक जबाबदारी आहे, असा कंपनीचा ठाम विश्वास असून, ही मॅरेथॉन त्या दिशेने उचललेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे एव्होनिथ स्टीलने स्पष्ट केले आहे.

## सेव्हलाइफ फाउंडेशन आणि पार्ले बिस्किट्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून नागपूरमधील ग्रामीण रुग्णालयांना गंभीर शस्त्रक्रिया उपकरणे सुपूर्द

**नागपूर, १९ जानेवारी :** प्राणघातक रस्ते अपघातांचा इतिहास असलेल्या उच्च-जोखीम असलेल्या कॉरिडॉरवर आपत्कालीन वैद्यकीय सेवा आणि ट्रॉमा केअर सेवा मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून, सेव्हलाइफ फाउंडेशनने पार्ले बिस्किट्स प्रायव्हेट लिमिटेडसोबत सीएसआर भागीदारीत, महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहकार्याने, नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील एनएच-३५३डी (उमरेड-भिवापूरोड) वर स्थित उमरेड ग्रामीण रुग्णालय आणि ट्रॉमा केअर युनिट आणि एनएच-४४ (नागपूर-देवलापरोड) वर स्थित देवलापार ग्रामीण रुग्णालयात गंभीर शस्त्रक्रिया उपकरणे सुपूर्द केली.



उमरेड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रभाकर वंजारी आणि देवळापार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय मेश्राम, सेव्हलाइफ फाउंडेशनच्या प्रतिनिधींसह संबंधित कार्यक्रमांना उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान बोलताना, उमरेड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रभाकर वंजारी म्हणाले, रस्ते अपघातातील दुखापतींमध्ये वेळेवर हस्तक्षेप करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने, या शस्त्रक्रिया उपकरणाच्या समावेशामुळे उमरेड ग्रामीण रुग्णालयाची आपत्कालीन दुखापतींना प्रतिसाद देण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल.

देवळापार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संजय मेश्राम यांनी प्रकाश टाकला.या मदतीमुळे आमच्या रुग्णालयाची आपत्कालीन तयारी बळकट होते आणि राष्ट्रीय महामार्ग-४४वर रस्ते अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना त्याचा थेट फायदा होईल. ग्रामीण स्तरावर ट्रॉमा केअर सेवांना बळकटी देण्यासाठी सेव्हलाइफ फाउंडेशन आणि पार्ले बिस्किट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रयत्नांचे आम्ही कौतुक करतो.

एनएच-३५३डी आणि एनएच-४४ हे जास्त वाहतूक आणि गंभीर रस्ते अपघातांना बळी पडण्याची शक्यता वाढविण्यासाठी ओळखले जातात. जानेवारी-नोव्हेंबर२०२५ दरम्यान, एनएच-४४मध्ये रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे १०४% वाढ झाली, २०२४ मध्ये २४ वरून २०२५ मध्ये ४९ पर्यंत. दरम्यान, एनएच-३५३डीमध्ये वर्षानुवर्षे १०% घट झाली, २०२४ मध्ये ३० मृत्यूंवरून २०२५ मध्ये २७ पर्यंत. एकूणच, नागपूर ग्रामीणमधील उच्च-प्राणघातक कॉरिडॉरमध्ये रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे ७.३% वाढ झाली, जानेवारी-नोव्हेंबर२०२४ दरम्यान २३३ वरून या वर्षी याच कालावधीत २५० पर्यंत. ग्रामीण रुग्णालयांना आवश्यक शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन काळजी उपकरणांनी सुसज्ज करून, हा उपक्रम ट्रॉमा केअरची तयारी सुधारण्याचा आणि रस्ते अपघातांमुळे होणारे प्रतिबंधात्मक मृत्यू आणि गंभीर दुखापती कमी करण्याचा प्रयत्न करतो.

भारतातील महामार्गांवर शून्य मृत्यूचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने डेटा-आधारित पुराव्यांचा वापर करून सेव्हलाइफ फाउंडेशन रस्ते सुरक्षा आणि ट्रॉमा केअरमध्ये आघाडीवर काम करत आहे.



## सेलू येथे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिर

**सावंगी (मेघे), वर्धा, १९ जानेवारी :** जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज, सावंगी (मेघे), वर्धा यांच्या वतीने आणि नॅशनल मेडिकल ऑर्गनायझेशन (एनएमओ), जेएनएमसी युनिट यांच्या सहकार्याने दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू येथे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. हा उपक्रम स्वामी विवेकानंद जयंती युवक दिनानिमित्त पार पडला. किशोरवयीन विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

या शिबिराअंतर्गत इयत्ता ८वी, ९वी व ११वीच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच शाळेतील सुमारे ६०० विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यायोगे त्यांच्या आरोग्य स्थितीचा आढावा घेता आला. या शिबिरासाठी नॅशनल मेडिकल ऑर्गनायझेशन, जेएनएमसी युनिटचे प्रमुख डॉ. अभिषेक जोशी, तसेच उपाध्यक्ष डॉ. आशीष अंजनकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता (डीन) डॉ. सोनाली चौधरी यांनी उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा, संतुलित आहार, मानवी कल्याण, मासिक पाळी स्वच्छता, ताण-तणावव्यवस्थापन, सोशल मीडिया आणि फोनचा योग्य वापर, अवयव दान, तसेच पर्यावरण संरक्षण यासंबंधी माहिती देण्यात आली. ही माहिती पोस्टर सादरीकरण व आरोग्यविषयक व्याख्यानांच्या माध्यमातून सादर करण्यात आली. शिबिराच्या आरोग्य शिक्षण व जनजागृती उपक्रमाचे आयोजन डॉ. अंबिका दास (सचिव, एनएमओ), डॉ. शुभम माणिकपूरे व एमबीबीएस विद्यार्थी तेजस कदम, प्रुत्वीराज चव्हाण यांच्या सहभागाने करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

हा उपक्रम कुलगुरू डॉ. ललित वाघमारे, डॉ. प्रसाद देशमुख व डॉ. तृप्ती वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## स्विगीवर ३ लाख चिकन बिर्यानीच्या ऑर्डर्सवर ४.८८ कोटी रूपयांची बचत करून डायनिंगआऊट... येथे आहे २०२५ मध्ये स्विगी नागपूरमध्ये कसे होते

**नागपूर, १९ जानेवारी :** नागपूरचे फूडी स्पिरीट, जुन्या शहराच्या ऐतिहासिक गल्ल्यांपासून ते डिजिटल युगापर्यंत, ओळखीच्या नाश्त्याच्या पदार्थांपासून आणि संध्याकाळच्या अल्पोपहारापासून ते रात्री उशिराच्या मेजवानीपर्यंत, सहजपणे पसरले आहे.

'भारताची भूक कशी' च्या नागपूर आवृत्तीला नक्की तपासा, जे शहराच्या बदलत्या खाद्य सवयींचे एक महत्त्वपूर्ण दृश्य आहे आणि गेलेल्या वर्षाचा एक स्वादिष्ट आढावा आहे.

शहराचे आवडते काय

३ लाख ऑर्डर्ससह चिकन बिर्याणी शहरात सर्वाधिक ऑर्डर केली जाणारी डिश ठरली. पनीर ग्रेव्ही आणि व्हेज बर्गर अनुक्रमे २ऱ्या आणि ३ऱ्या क्रमांकावर राहिले, ज्यावरून हे पदार्थ पोट भरण्यासाठी आणि आवड म्हणून असल्याचे लक्षात येते.

डेझर्टच्या निवडीमध्ये पारंपरिक पदार्थांना पसंती देण्यात आली. काजूबर्फी एका दिवशी १०९ ऑर्डर प्रमाणे यादीत अव्वल स्थानी होती, त्यानंतर गुलाब जामून आणि बुंदी लाडू यांचा क्रमांक लागतो. नागपूरकरांनी मँगो रसमलाई, मँगो पेढा आणि मूग डाळ हलवा यांनाही पसंती दर्शवली, ज्यांचा समावेश सर्वाधिक ऑर्डर केलेल्या १० डेझर्टमध्ये होता.

सकाळच्या घाईची नवीन व्याख्या: नाश्ता म्हणजे शहराची सर्वात वेगाने वाढणारी जेवणाची वेळ बनत चालली आहे, ज्यामुळे बाकी गोष्ट मागे पडत आहेत, आणि नाश्त्याच्या ऑर्डरमध्ये पूर्वीच्या तुलनेत ५३% ची मोठी वाढ झाली आहे. नाश्त्याच्या ऑर्डरमध्ये इडली सर्वात पुढे होती, दररोज सकाळी सरासरी १०७ ऑर्डर मिळत होत्या, त्यानंतर व्हेज डोसा आणि पोह्याचा क्रमांक लागतो. मेदू वडा, व्हेज वडा आणि सामोसा हे देखील दिवसाची सुरुवात करण्यासाठी आवडत्या पदार्थांपैकी होते.

नाश्त्याच्या वेळी (दुपारी ३ ते संध्याकाळी ७) व्हेज बर्गर, चिकन बर्गर आणि व्हेज पिझ्झा हे सर्वाधिक पसंतीचे पदार्थ होते.

रात्री उशिरा (मध्यरात्री १२ ते २) मोठ्या प्रमाणात खाण्याची सवय वाढत चालली आहे, ज्यामुळे अशा ऑर्डरमध्ये वार्षिक ४२.६% पेक्षा जास्त वाढ झाली. चिकन बिर्याणी सर्वात लोकप्रिय ठरली, तर चिकन बर्गर आणि व्हेज बर्गर अनुक्रमे २ऱ्या आणि ३ऱ्या क्रमांकावर राहिले.

परवडणाऱ्या किमतींमुळे नागपूरकरांना ही संकल्पना खूप आवडली. ९९ स्टोअरवर, व्हेज बर्गर ही सर्वाधिक ऑर्डर केली जाणारी डिश होती. चिकन बिर्याणी दुसऱ्या क्रमांकावर होती, त्यानंतर चिकन बर्गर आणि आलू बर्गरचा क्रमांक लागतो.

प्रवासादरम्यानच्या खाण्याच्या इच्छा सुद्धा वाढल्या आहेत. नागपूर जंक्शनवर 'फूड ऑन ट्रेन' सुविधेद्वारे दिल्या जाणाऱ्या ऑर्डर्समध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत २०२५ मध्ये जवळपास ४००% वाढ झाली, ज्यावरून फूड डिलीव्हरी हा प्रवासाचा एक अविभाज्य भाग बनला आहे.

डेस्कइट्सवर, शाही राज कचोरी ही दररोज सरासरी ७० ऑर्डर्ससह सर्वाधिक ऑर्डर केली जाणारी डिश आहे, त्यानंतर कॉर्पोरेट व्यावसायिकांकडून इडली सांबार आणि व्हेजी चीज सँडविच-ग्रिल्ड यांना पसंती दिली जाते. एका ग्राहकाने एकाच ऑर्डरमध्ये २५ पनीर रोल्स मागवले -शहरात ही सर्वाधिक संख्या आहे. याला म्हणतात ऑफिस पार्टी!

बोल्टमुळे फूड डिलीव्हरी जलद करणे शक्य झाले बोल्टवर, जलद डिलिव्हरीच्या आवडत्या पदार्थांमध्ये चिकन बिर्याणी आघाडीवर होती. काजू कतली ही बोल्टवर सर्वाधिक ऑर्डर केलेली मिठाई होती. ऑरेंज बर्फी आणि मोतीचूर लाडू दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. इतर आवडत्या मिठाईमध्ये रसमलाई, केसर पेडा, मथुरा पेडा आणि मलाई पेडा यांचा समावेश होता.

बिर्याणीवरील प्रेम २४७ तास कायम राहिले. रात्री उशिरा (मध्यरात्री १२ ते पहाटे २) खाण्यासाठी चिकन बिर्याणी ही सर्वाधिक ऑर्डर केली जाणारी डिश होती, त्यानंतर चिकन शॉवरमा आणि चिकन बर्गरचा क्रमांक लागतो.

शेवटच्या क्षणी काही वस्तूंची गरज आहे का? शहरातील सर्वात मोठी बोल्ट ऑर्डर एका ग्राहकाने दिली होती, ज्याने मोतीचूर लाडूचे ५ बॉक्स आणि काजू कतलीचे वेगळे ६ बॉक्स मागवले होते.

ट्रेंड्सबाबत सविस्तर माहिती देताना स्विगी चे फूड मार्केटप्लेसचे चीफ बिझनेस ऑफिसर सिद्धार्थ भाकू म्हणाले, २०२५ मध्ये अन्न हे आपल्या दैनंदिन जीवनाचा आणि सण-उत्सवांचा अविभाज्य भाग राहिले. भारताने आपल्या आवडत्या पदार्थांचा मनसोक्त आनंद घेतला. नागपूर शहरात आम्हाला पारंपरिक चवींवरील प्रेम आणि राष्ट्रीय स्तरावरील आवडत्या पदार्थांचा आराम यांचा सुंदर समतोल पाहायला मिळाला. उशिरा रात्रीच्या खाण्यापासून ते प्रीमियम डायनिंग आउटपर्यंत, नागपूरकरांनी अन्नाच्या माध्यमातून शहराची समृद्ध सांस्कृतिक विविधता स्वीकारली. अन्न ही एक भावना आहे आणि शहराच्या प्रत्येक कोपऱ्यात, प्रत्येक जेवणातून, प्रत्येक साजऱ्या क्षणातून उत्कृष्ट फूड अनुभव देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

## भाईचुंग भूटिया रेसिडेन्शियल फुटबॉल अकादमीने नागपूर ट्रायल्सची घोषणा केली

**नागपूर, १९ जानेवारी :** भारतातील सर्वात मोठ्या आणि उच्च दर्जाच्या फुटबॉल विकास कार्यक्रमांपैकी एक असलेल्या बायचुंग भूटिया फुटबॉल स्कूल्स (बीबीएफएस) ने नागपूरमध्ये बीबीएफएस रेसिडेन्शियल अकादमीसाठी प्रतिभावान तरुण विद्यार्थी-खेळाडूंचीओळख पटविण्यासाठी स्काउटिंग चाचण्या घेतल्या आहेत. बीबीएफएस रेसिडेन्शियल अकादमी ही संस्थेची मुख्य उच्च-कार्यक्षमतफुटबॉल प्रशिक्षण आणि शैक्षणिक अभ्यासक्रम आहे, जी भारतातील प्रसिद्ध बोर्डिंग स्कूलच्या सहकार्याने काम करते. या चाचण्या रविवार, २५ जनवरी २०२६ रोजी जॉगर्स पार्क फुटबॉल ग्राउंडवर आयोजित केल्या जातील, ज्यामध्ये सहभागींना सकाळी ८:३० वाजता रिपोर्ट करणे आवश्यक आहे. २०१० ते २०१५ दरम्यान जन्मलेले फुटबॉल खेळाडू सहभागी होण्यास पात्र आहेत.



ट्रायल्समध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी वैध सरकारी ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे. त्यांनी जर्सी, शॉर्ट्स, फुटबॉल बूट आणि शिन गार्डसह संपूर्ण फुटबॉल किट परिधान केलेले असावे. ट्रायल्सच्या उच्च-तीव्रतेच्यस्वरूपामुळे खेळाडूंनी पर्सनल हायड्रेशन पॅक / पाण्याची बाटली आणणे आवश्यक आहे. नोंदणी बीबीएफएस च्या अधिकृत स्पोर्ट्स लर्निंग आणि पार्टिसिपेशन प्लॅटफॉर्म एनजोगो ॲप द्वारे ऑनलाइन करू शकता.

या उपक्रमाबद्दल बोलताना, बीबीएफएसचे सह-संस्थापक आणि भारतातील सर्वात प्रसिद्ध फुटबॉल आयकॉनपैकी एक, भाईचुंग भूटिया म्हणाले, ही ट्रायल्स त्या युवा खेळाडूंसाठी मोठी संधी आहेत जे त्यांच्या शिक्षणाशी तडजोड न करता प्रोफेशनल फुटबॉल खेळण्याचे स्वप्न बाळगतात. आमचे उद्दिष्ट कमिटेड विद्यार्थीखेळाडू ओळखणे आणि त्यांना शिकण्यासाठी, प्रशिक्षण घेण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी आवश्यक वातावरण, कोचिंग आणि संस्कृती उपलब्ध करून देणे आहे. बीबीएफएस रेसिडेन्शियल अकादमी प्रतिभावान युवांना पूर्ण क्षमतेने विकसित होण्याची आणि उच्च स्तराच्या खेळासाठी तयार होण्याची संधी देते.

गेल्या काही वर्षांत, बीबीएफएस ने वरिष्ठ परवानाधारक प्रशिक्षकांचे एक संरचित स्काउटिंग नेटवर्क तयार केले आहे, जे संपूर्ण भारतातील मजबूत टॅलेंट पाइपलाइन असलेल्या मोठ्या क्षेत्रांना कव्हर करते.

बीबीएफएस रेसिडेन्शियल अकादमी एक एकात्मिक फुटबॉल + शिक्षण मॉडेल देते, जे दीर्घकालीन खेळाडू विकासासाठी डिझाइन केलेले आहे. जागतिक दर्जाच्या टॉप अकादमींच्या प्रमाणांना अनुसरून तयार केलेला हा कार्यक्रम अनुभवी शिक्षक आणि समन्वयक यांच्या देखरेखीखाली एलिट फुटबॉल ट्रेनिंग आणि औपचारिक शिक्षण यांचा मिलाप करतो.

# आज का अंदाज

## मंगळवार २० जानेवारी २०२६

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| पत्थर फोड एकच | पत्थर फोड एकच |
| १ - ४ - ५ - ८ | ४ - ७ - ८ - ९ |
| ३८० - ३३८ - १६८ - १२५ | १५८ - १६० - ४७७ - ९०० |
| २९० - २२० - ३४८ - २६० | ३४७ - २७८ - ५५८ - ४५० |
| १०० - ११२ - २५८ - ३५० | २५७ - ३५९ - ३६९ - ५५९ |
| जोडी | जोडी |
| १२ - ४२ - ५९ - ८९ | ४० - ७० - ८५ - ९५ |
| १६ - ४६ - ५७ - ८७ | ४३ - ७३ - ८२ - ९२ |
| १० - ४० - ५३ - ८३ | ४१ - ७१ - ८६ - ९६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २० जानेवारी

## मंगळवार २० जानेवारी २०२६

**सर्व बाजार साठी**

३१ - ६१ - ९४ - ०४
३७ - ६७ - ९५ - ०५
३३ - ६६ - ९८ - ०८

---

१५७ - ६०० - १९९ - १४५
४९० - ४५७ - ३६० - ३८९
२२९ - २४० - ५६८ - २८०

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८९ | | ३७७ | | ४७९ | | १९९ | | ४८० | | ५०० | |
| २८८ | ८ | १६० | ७ | ३८९ | ० | २८९ | ९ | ५७० | २ | १४० | ५ |
| ३७८ | | २५० | | २९९ | | ३७९ | | ६६० | | २३० | |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४६ | | २३८ | | ६९९ | | ४७० | | १९० | | १२४ | |
| ३९० | २ | ६७० | ३ | २६६ | ४ | ५६० | १ | २८० | ० | २७८ | ७ |
| १२९ | | ३०० | | ४४६ | | ३८० | | ३७० | | ४४९ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ - ९ - ० - १ - ७

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034

# राशीभविष्य

**मेष :** जुना आजार पुन्हा डोके वर काढू शकतो, त्यामुळे तब्येतीची काळजी घ्या. आर्थिक व्यवहारात स्पष्टता ठेवा. कारण उधार घेतलेले पैसे परत करावे लागू शकतात.

**वृषभ :** आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे; बाहेरील अन्नपदार्थ टाळावे. व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास चांगला नफा मिळेल. कुटुंबाकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**मिथुन :** विरोधकांपासून सावध राहा. मुलांच्या शैक्षणिक अडचणी सोडवण्यासाठी वेळ द्यावा लागेल. तुमची एखादी मोठी इच्छा पूर्ण होऊ शकते. जुन्या चुकांमधून धडा घेऊन पुढे जाणे फायद्याचे ठरेल.

**कर्क :** निर्णयक्षमतेत सुधारणा होईल. मित्रांशी संबंध दृढ होतील. धार्मिक कार्यात तुमचा रस वाढेल. पूजेत वेळ घालवाल. रागावर नियंत्रण ठेवा. भावंडांना दिलेला सल्ला त्यांच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**सिंह :** सासरच्या मंडळींकडून येणे असलेले पैसे परत मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या मोठ्या प्रोजेक्टवर काम करण्याची संधी मिळेल. कामातील अडथळे दूर होतील. प्रयत्न करणे सोडू नका.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा असेल. ज्यामुळे तुम्हाला मोठा आनंद मिळू शकतो. मात्र, स्वभाव काहीसा चिडचिडा होईल. त्यामुळे अनावश्यक राग टाळणे हिताचे ठरेल.

**तूळ :** आज निर्णयक्षमता उत्तम राहील. बुद्धिमत्तेच्या जोरावर तुम्ही विरोधकांवर सहज मात कराल. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील.

**वृश्चिक :** एखादी इच्छा पूर्ण झाल्याने तुम्ही धार्मिक तीर्थयात्रेला जाऊ शकता. मुलांच्या संगतीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कुटुंब आणि मित्रांची साथ लाभेल. प्रकृतीकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.


**धनु :** कुटुंबातील सदस्यांशी वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बोलताना संयम ठेवा. घराचे नूतनीकरण किंवा वैयक्तिक गरजांवर खर्च होऊ शकतो. कुटुंबात एकजुटीचे वातावरण राहील.

**मकर :** आजचा दिवस छंद जोपासण्यासाठी आणि आनंदासाठी खरेदी करण्याचा आहे. बोलण्यावर आणि वागण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्राकडून एखादी चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** कुटुंबातील सदस्यांसोबत आजचा वेळ आनंदात जाईल. तुमच्या मनातील नवीन कल्पनांमुळे घरातील वातावरण सकारात्मक राहील. घरात शुभ कार्याचे संकेत आहेत. आत्मविश्वास वाढलेला असेल.

**मीन :** तुमची हरवलेली प्रिय वस्तू आज सापडण्याची शक्यता आहे. प्रेमात असलेले व्यक्ती जोडीदारासोबत प्रवासाचा बेत आखू शकतात. कामाच्या ठिकाणी तुमच्या कार्याचा गौरव होईल.

# शब्दकोडे क्रमांक २३३१



**आडवे शब्द :-**

१) *** *** ** ** देव देतो दोन, मागणीपेक्षा जास्त मिळणे
७) मालमत्ता, द्रव्य
९) होडी
१०) वर-वधूची मिरवणूक
११) भिंतीवर सरपटणारा प्राणी
१२) अंत:पूर
१४) सुकुमार व सुंदर
१७) तृतीया
२०) लाकूड चिरण्याचे हत्यार
२२) वेदनेने भरलेले
२५) नूतन
२७) श्रेष्ठ अभिनेता
२८) जरच्या बरोबरचा शब्द
३०) अर्धांगवायू
३१) दुर्मिळता, अभाव
३३) बांगडीच्या आकाराचे (ग्रहण)
३६) जन्म देणारी
३८) दहावी रास
३९) पुन्हा
४१) पुरुष
४२) नर मांजर
४३) उत्सव
४४) मोठा हातोडा
४५) छोटा डबा
४६) प्रस्थान करणे
४८) भविष्य कथनाचा एक प्रकार
५०) दाट, ढग
५१) वैद्यकशास्त्रातील त्रिदोषातील एक
५२) सदोदित
५४) करार, भिस्त
५६) एक दिवंगत हिंदी संगीतकार
५९) समतल
६१) धमनी
६२) जमिनीत पुरणे
६३) धातूचा धागा
६४) राजाची मुलगी
६५) फुरसत
६६) संतापी.

**उभे शब्द :-**

१) परग्रहावर जाणारे वाहन
२) पृथ्वी
३) मावशीचा नवरा
४) फणसातील खाद्य भाग
५) अडखळत बोलणारा
६) कापूस
७) नदीच्या दोन बाजू
८) पाणी
१३) तोंडातोंडी झालेला व्यवहार
१५) जामीनकी
१६) वाद्य वाजविण्याची कला
१८) सातव
१९) भीती
२१) समशेर
२३) किल्ल्याभोवतीची भिंत
२४) मृत्यू
२६) शूर पुरुषाच्या हातातील कडे
२९) मणका
३२) गोलाकार, गोल गोल फिरणारा
३४) हात
३५) कंजूस, चिक्कू माणूस
३६) आपले राष्ट्रगीत
३७) मऊ
३८) चर्चा
४०) उत्साहाने, तडफतेने काम करणारा
४४) गर्द रान, निबीड
४७) नेत्र, डोळे
४९) गादी, तख्त
५१) उणीव
५३) नाश, हानी, नासाडी
५५) भात शिजतानाचा आवाज
५७) विजयादशमी
५८) चित्ताकर्षक, मोह उत्पन्न करणारे.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर






## झटपट बनवा पोटॅटो पॅनकेक

झटपट रेसिपी



मित्रांनो, तुम्ही वेगळी रेसिपी म्हणून पोटॅटो पॅनकेक बनवू शकता. झटपट होणारी ही रेसिपी तुम्हाला नक्कीच आवडेल.

**साहित्य :** एक कप बटाट्याचा कीस, अर्धा कप तांदळाचं पीठ, बारीक चिरलेल्या दोन हिरव्या मिरच्या, दोन चमचे दाण्याचं कूट, मीठ आणि तेल.

**कृती :** बटाट्याचा कीस, तांदळाचं पीठ, हिरव्या मिरच्या, दाण्याचं कूट आणि मीठ एका भांड्यात एकत्र करा. त्यात थोडं पाणी घालून घट्टसर पीठ तयार करा. आता तवा गॅसवर ठेवा. त्यावर थोडं तेल घाला. या पिठाचे गोलाकार पॅनकेक तव्यावर टाका. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा. झटपट होणारी ही रेसिपी रात्रीच्या जेवणासाठी बनवता येईल.

## मशरूमचा वेलू गेला गगनावरी!

अचिव्हर



उत्तराखंडातील पौडी गढवालचे रहिवासी नवीन पटवाल आणि पूनम शर्मा हे इंजिनीयर कपल आहे. नवीनने कॉम्प्युटर सायन्समध्ये बी. टेक केलं, तर पूनम ही आयआयटी खड्गपूरची पदवीधर आहे. पूनमने पूर्वी एसआयडीबीआय बँकेत नोकरी केली, पण २०१३ मध्ये तिने नोकरी सोडून नवीनच्या व्यवसायात साथ दिली. २००७ मध्ये नवीनने आधुनिक पद्धतीने बटन मशरूमची शेती सुरू केली. हळूहळू हा व्यवसाय वाढला आणि २०१६ पर्यंत रोज तीन टन मशरूमचे उत्पादन होऊ लागले. ते दिल्लीच्या आझादपूर मंडईत पुरवठा करायचे.

२०२० मध्ये कोरोना महामारीमुळे देशव्यापी लॉकडाउन लागले. त्या वेळी नवीनच्या फार्मवर तीन टन म्हणजे ३००० किलो बटन मशरूम तयार होते. ट्रक दिल्लीला जाण्यासाठी सज्ज होते; पण लॉकडाउनमुळे सर्व काही ठप्प झाले. मशरूमची शेल्फ लाइफ फक्त तीन दिवस असते, त्यामुळे कोल्ड स्टोरेज नसल्याने ते सगळे फेकावे लागले. यामुळे त्यांना पूर्ण दोन कोटी रुपयांचा फटका बसला. एकाच खरेदीदारावर आणि एकाच उत्पादनावर अवलंबून राहण्याची चुकीची धोरणे त्यांना समजली.

या मोठ्या नुकसानानंतरही नवीन आणि पूनम खचले नाहीत. त्यांनी शिकलेल्या धड्यांवरून नवीन रणनीती आखली. २०२० मध्येच त्यांनी 'प्लॅनेट मशरूम' नावाचा नवीन ब्रँड सुरू केला. यात त्यांनी फक्त बटन मशरूमवर अवलंबून न राहता विदेशी आणि दुर्मीळ जातींची लागवड सुरू केली. यामध्ये शिटाके, किंग ऑयस्टर, लायन्स मेन, रेशी आणि कॉर्डिसेप्स सारख्या मशरूमचा समावेश आहे. या जातींची किंमत प्रति किलो १००० ते १२०० रुपये इतकी आहे.

आज त्यांच्या फार्मवर रोज ३.५ टन बटन मशरूम आणि प्रत्येक विदेशी जातीचे १०० किलो असे एकूण सुमारे चार टन मशरूमचे उत्पादन होते. त्यांनी स्वतःची मशरूम स्पॉन लॅब उभी केली. त्यामुळे ते पूर्णपणे स्वावलंबी झाले. नुकत्याच त्यांनी गुच्छी मशरूमचीही यशस्वी लागवड केली. ती जगातील सर्वात महागडी मशरूम मानली जाते. यासाठी त्यांनी १२ कोटींचे कर्ज घेऊन व्यवसायाचा विस्तार केला.

नवीन-पूनमने डिजिटल मार्केटिंगचा चांगला वापर केला. त्यांनी स्वतःची वेबसाइट तयार केली. तिथून ग्राहक थेट मशरूम खरेदी करू शकतात. सोशल मीडियावरही त्यांचा चांगला प्रभाव आहे. एकाच मंडई किंवा दलालावर अवलंबून न राहता थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची रणनीती यशस्वी ठरली. या सर्व प्रयत्नांमुळे त्यांचा व्यवसाय पुन्हा उभा राहिला.

दोन कोटींच्या तोट्यातून बाहेर पडून नवीन आणि पूनमने आपली कंपनी १५ कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीपर्यंत पोहोचवली आहे. संकटातही धैर्य आणि नवीन विचारांनी मोठे यश मिळवता येते, हे यांच्या उदाहरणातून दिसून येते.

### शेर की जुबानी

हर बार हम पर इल्जाम
लगा देते हो मोहब्बत का,
कभी खुद से भी पुछा है
इतकी खुबसूरत क्यों हो!

हम तो आईना हैं
आईना ही रहेंगे,फिक्र वो
करे...जिनके चेहरे पे कुछ
और दिल में कुछ और है।

ढूंढना है तो परवाह करनेवालों
को ढूंढिये साहब,
इस्तेमाल करनेवाले तो,
खुद ही आपको ढुंढ लेंगे।

### टेक्नो टॉक




## उच्च रक्तदाबाबद्दल अगोदरच मिळेल माहिती!

'ॲपल'ने भारतातील त्यांच्या युजर्ससाठी एक प्रमुख आरोग्य अद्यतन जारी केले आहे. वॉचओएस २६ सोबत येणारे 'हायपरटेन्शन नोटिफिकेशन' फीचर आता ॲपल वॉच युजर्सना हायपरटेन्शन किंवा उच्च रक्तदाबाच्या सुरुवातीच्या लक्षणांबद्दल सतर्क करू शकते. भारतीय युजर्ससाठी हे 'ॲपल'च्या सर्वात महत्त्वाच्या आरोग्य फीचर्सपैकी एक मानले जाते. भारतातील लाखो लोक उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत, परंतु बहुतेकदा त्यांना ते माहितीच नसते. कारण उच्च रक्तदाब लक्षणांशिवाय वाढतो. रुग्णालयात एकाच रक्तदाब तपासणीतून खरी स्थिती उघड होत नाही. 'ॲपल वॉच'ला 'स्मार्ट अर्ली-वॉर्निंग सिस्टम'मध्ये रूपांतरित करून ही पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करत आहे. 'ॲपल वॉच' हृदयाच्या ठोक्यासह रक्तवाहिन्यांच्या प्रतिसादाचा मागोवा घेण्यासाठी ऑप्टिकल हार्ट सेन्सरचा वापर करते. ते सलग ३० दिवसांत गोळा केलेल्या या डेटामध्ये उच्च रक्तदाबाशी संबंधित नमुने शोधत असेल तर युजरला त्वरित सूचना पाठवली जाते. हे फीचर मोठ्या क्लिनिकल अभ्यास आणि मशीन लर्निंग मॉडेल्सवर आधारित आहे.

**हे वैशिष्ट्य कोण वापरू शकते?**

युजर २२ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचा असावा. हे फीचर गर्भवती वापरकर्त्यांसाठी उपलब्ध नाही. हे फीचर पूर्वी निदान झालेल्या उच्च रक्तदाब असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेले नाही. 'ॲपल वॉच' अलर्ट पाठवत असेल तर कंपनी शिफारस करते की युजरने पुढील सात दिवसांसाठी प्रमाणित रक्तदाब मॉनिटरने त्यांचा रक्तदाब मोजावा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### ॲप वर्ल्ड



## इन्स्ट्राग्राममध्ये नवीन फीचर्स

इन्स्टाग्रामने यूजर्सचा अनुभव अधिक सुरक्षित, क्रिएटिव आणि 'एआय' आधारित बनवण्यासाठी अनेक अनोखे फीचर्स लाँच केले आहेत, पण इनस्टाग्रामचा सतत वापर न करणाऱ्यांना याबद्दल अजूनही माहिती नाही.

*** इन्स्टाग्राम एआय एजंट्स**

२०२५ मध्ये लाँच झालेले हे सर्वात मोठे फीचर आहे. यूजर्स आता स्वतःचे 'एआय अवतार' तयार करू शकतात. हे 'एआय एजंट्स' तुमच्या वतीने तुमच्या फॉलोअर्सच्या कमेंट्सना आणि मेसेजेसना उत्तरे देऊ शकतात. त्यामुळे क्रिएटर्सना चाहत्यांशी जोडले राहणे सोपे झाले आहे.

*** 'एआय इमेज एडिटिंग'**

आता फोटो अपलोड करताना 'एआय एक्सपान्ड' आणि 'बॅकग्राउंड स्वॅप' सारखे टूल्स उपलब्ध झाले आहेत. यामुळे कोणताही साधा फोटो प्रोफेशनल दिसू शकतो. तसेच फोटोंमधील नको असलेले भाग काढण्यासाठी 'मॅजिक इरेजर' अधिक अचूक बनवण्यात आले आहे.

*** रील्स 'को-क्रिएशन'**

या फीचरमुळे एकाच वेळी चार मित्र मिळून एक रील तयार करू शकतात. यामध्ये 'मल्टी विंडो कोलॅबोरेशन'ची सुविधा दिली आहे, ज्याद्वारे चारही क्रिएटर्सच्या प्रोफाइलवर हे रील एकाच वेळी दिसू शकते.

*** चॅटमध्ये रिअल टाइम ट्रान्सलेशन**

२०२५ मध्ये इन्स्टाग्रामने जागतिक संपर्क वाढवण्यासाठी चॅटिंगमध्ये स्वयंचलित भाषांतर सुविधा दिली आहे. तुम्ही परदेशी व्यक्तीशी बोलत असाल तर त्यांचे मेसेजेस तुमच्या भाषेत रिअल टाइममध्ये भाषांतरित होतील.

*** व्हर्च्युअल रिॲलिटी स्टोरीज**

'मेटा'च्या नवीन 'क्वेस्ट' चष्म्यांशी सुसंगत अशा 'थ्री डी स्टोरीज' आता पोस्ट करता येतात. यामुळे यूजर्सना केवळ फोटो किंवा व्हिडिओ न पाहता, त्या वातावरणाचा ३६० डिग्री अनुभव घेता येतो.

*** प्रायव्हसी 'घोस्ट मोड'**

प्रायव्हसी अधिक कडक करण्यासाठी इन्स्टाग्रामने अधिकृत 'घोस्ट मोड' लाँच केला आहे. हे फीचर सुरू केल्यावर तुम्ही कोणाचे मेसेजेस वाचले आहेत किंवा तुम्ही ऑनलाइन आहात की नाही, हे कोणालाही कळणार नाही

*** कस्टमायझेबल प्रोफाइल लेआउट**

वर्षानुवर्षे चालत आलेली ३३ ग्रीड सिस्टीम आता बदलता येते. यूजर्स त्यांच्या प्रोफाइलवर महत्त्वाचे फोटो मोठ्या आकारात किंवा वेगळ्या मांडणीत (लेआऊट) सेट करू शकतात.

*** नोट वरील 'व्हिडिओ नोट्स'**

'नोट्स' या फीचरमध्ये आता लहान लूपिंग व्हिडिओ किंवा थेट म्युझिक क्लिप्स शेअर करण्याची सोय करण्यात आली आहे.

## रसायनशास्त्रात करिअर

करियर



रसायनशास्त्रात रस असेल तर रासायनिक अभियांत्रिकी किंवा औद्योगिक रसायनशास्त्र यात करियर करता येईल. दोन्ही रसायनशास्त्राचाच भाग आहेत, परंतु त्यांचे काम पूर्णपणे वेगळे आहे.

औद्योगिक रसायनशास्त्रात पदार्थ तयार करण्यासाठी संशोधनाचा समावेश आहे. या अभ्यासक्रमात तुमचे प्राथमिक लक्ष प्रयोगशाळेत पदार्थांची रसायनशास्त्र समजून घेणे आणि सुधारणे आहे. दुसरीकडे, रासायनिक अभियांत्रिकी कोणतेही पदार्थ किंवा रसायने तयार करत नाही; त्याऐवजी ते सामान्य लोकांसाठी वापरण्यायोग्य बनवण्याचे उद्दिष्ट ठेवते. त्याचे ध्येय केवळ रसायने समजून घेणे नाही तर मोठ्या कारखान्यांमध्ये सुरक्षितपणे आणि किफायतशीरपणे त्यांचे उत्पादन करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणे आहे.

**औद्योगिक रसायनशास्त्रात काय शिकवले जाते?**

तुम्ही औद्योगिक रसायनशास्त्रात बी. टेक करत असाल तर तुम्हाला नवीन पदार्थ किंवा रसायन तयार करण्यासाठी संशोधन कसे केले जाते हे शिकायला मिळेल. यामध्ये एक नवीन उत्पादन किंवा पदार्थ तयार करणे समाविष्ट आहे. तुमचे लक्ष रसायनांचे समन्वय साधण्यावर आणि एक नवीन आणि सुधारित सूत्र विकसित करण्यावर आहे.

**रासायनिक अभियांत्रिकीमध्ये काय शिकवले जाते?**

रासायनिक अभियांत्रिकीमधील बी.टेक तुम्हाला मोठ्या प्रमाणात उत्पादन तयार करण्यासाठी तयार सूत्र कसे वापरायचे हे शिकवते. या अभ्यासक्रमात मोठ्या प्रमाणात उत्पादन तयार करण्यासाठी यंत्रसामग्री आणि वनस्पती डिझाइन करणे समाविष्ट आहे. रासायनिक अभियांत्रिकी शिकणारे हे सुनिश्चित करतात, की उत्पादने कारखान्यांमध्ये कार्यक्षमतेने तयार केली जातात, कमी वीज वापरतात आणि उत्पादन खर्च कमी करतात.

**या क्षेत्रातील करिअर पर्याय**

रासायनिक अभियांत्रिकीमधील बी. टेक अनेक क्षेत्रात करिअर पर्याय देते. तुम्ही रिलायन्स, ओएनजीसी आणि टाटा केमिकल्स सारख्या प्रमुख उद्योगांमध्ये काम करू शकता. येथे तुमचे प्राथमिक काम मोठे प्लांट व्यवस्थापित करणे, नवीन यंत्रसामग्री डिझाइन करणे आणि कारखान्यांमध्ये उत्पादित होणारी उत्पादने उच्च दर्जाची आहेत याची खात्री करणे आहे.

## बोटिंगसाठी गोरखपूरला जा!

भटकंती



पूर्व उत्तर प्रदेशच्या गोरखपूरची ओळख आता केवळ धार्मिक आणि ऐतिहासिक शहरापुरती मर्यादित राहिलेली नाही. येथील रामगढ सरोवर आज एक सुंदर पर्यटनस्थळ म्हणून उदयाला आले आहे. याशिवाय आता नवीन वर्षात योगी सरकार चिलुआतालालाही पर्यटनस्थळ बनवत आहे.

गोरखपूरमध्ये आता तुम्ही चिलुआतालमध्ये नौकाविहाराचा आनंद घेऊ शकता. योगी सरकार याला पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनवत आहे. येथे ५७० मीटर पदपथ बांधण्यात आला आहे. ७० मीटरपर्यंत घाटाच्या पायऱ्या बांधण्यात आल्या आहेत. याशिवाय रेलिंग, सोलर दिवे, इंटरलॉकिंग, सीसी रोड, बेंच, ॲप्रोच रोड, बोल्डर पिचिंग, दुकान, स्वच्छतागृह, फीडिंग रूम अशा अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला या तलावाचे उद्घाटन झाले आहे; पण त्यापूर्वीपासूनच लोक तलावाच्या काठावर मॉर्निंग वॉक करण्यासाठी येत होते. शांत पाणी, थंड वारा, तलावाच्या काठावर बनलेले रस्ते आणि रंगीबेरंगी दिव्यांमध्ये नौकाविहाराचा अनुभवही खूप खास ठरणार आहे.

**रामगड फिरण्यासाठी एक उत्तम ठिकाण**


गोरखपूरमधील रामगड आधीपासूनच नौकाविहारासाठी प्रसिद्ध आहे. लोक येथे कुटुंबासह सहलीला येतात, नौकाविहाराला जातात आणि तलावाच्या काठावर वेळ घालवतात. नौकाविहाराव्यतिरिक्त, मुलांसाठी उद्याने आणि चालण्याचे ट्रॅक तसेच फूड झोन आहेत, जिथे आपण आरामात अनेक स्वादांचा आनंद घेऊ शकता. त्याचबरोबर संध्याकाळच्या वेळी येथील सूर्यास्ताचे दृश्यही खूप आश्चर्यकारक असते.

**सोहागीबरवा अभयारण्य एक्सप्लोर करा**

गोरखपूरपासून सुमारे ७० किलोमीटर अंतरावर महाराजगंजमधील सोहगीबरवा अभयारण्यदेखील नवीन वर्षात भेट देण्यासाठी एक चांगले ठिकाण आहे.

## खर्च वाढत चालला आहे!

मॅच मकिंग



मी २७ वर्षांचा तरुण असून गेल्या दोन वर्षांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. ती माझी ऑफिसमधली सहकारी आहे. पहिल्याच भेटीत आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो. ती खूप महत्त्वाकांक्षी आहे. स्वावलंबी असल्याचा तिला खूपच अभिमान आहे. हे सगळं असलं तरी ती सतत खरेदी करते. नको असलेल्या वस्तूही ती खरेदी करून आणते. यामुळे तिचा पगार आठवडाभरात संपतो. मग खरेदी करता येत नसल्यामुळे तिला नैराश्य येतं. तिची ही अवस्था बघून मी तिला माझं क्रेडिट कार्ड देतो. हो, नाही म्हणत अखेर ती ते घेते आणि पुन्हा भरपूर खरेदी करते. पण तिच्या या सवयीमुळे माझं दिवाळं निघू लागलं आहे. तिने मध्यंतरी मला न विचारता चक्क आयफोन खरेदी केला. पैसे खर्च करण्यावर नियंत्रण आणायला सांगितल्यावर ती माझ्यावर खूप चिडते. तुझ्याकडून पैसे मागितले नसल्याचं सांगते. मी तिला समुपदेशकांकडे जाण्याचा सल्लाही दिला. सततच्या सल्ल्यांना कंटाळून तिने माझ्याशी बोलणं बंद केलं. माझं तिच्यावर खूप प्रेम आहे. पण तिच्या या सवयीमुळे माझ्याकडे काहीच पैसे उरणार नाहीत. मला माझ्या भविष्यासाठी गुंतवणूक करावी लागेल. अशा परिस्थितीत मी काय करू?

– मला वाटतं, तू तिला परिस्थितीची जाणीव करून द्यायला हवीस. खरेदी करू नकोस असं सांगण्यापेक्षा तुमच्या भविष्यासाठी पैसा जोडणं किती महत्त्वाचं आहे हे तिला सांग. तुला तुझ्या नात्यात काही बंधनं आणणंही गरजेचं आहे. ही मुलगी स्वावलंबी आहे, असं तू म्हणालास. तू तिला क्रेडिट कार्ड वापरायला दे. पण रकमेवर काही बंधनं आण. तिला आर्थिक नियोजनाचं महत्त्व समजावून सांग. पगार वाचवण्यासाठी मार्गदर्शन कर. टप्प्याटप्प्याने पुढे जा. तुला संयम बाळगावा लागेल.

## पुरुषांसाठी को-ऑर्ड सेट्स

फॅशन पॅशन



परिपूर्ण पोशाखाचा विचार केला जातो तेव्हा पुरुषांना अनेकदा छान दिसणारे आणि घालण्यासदेखील अत्यंत आरामदायक असणारे काहीतरी हवे असते. ही गरज लक्षात घेऊन, पुरुषांचे को-ऑर्ड सेट्स आजकाल स्टायलिश पुरुषांसाठी पसंतीचे पर्याय बनत आहेत.

तुम्ही एखाद्या हिल स्टेशनला जात असाल, समुद्रकिनारी सुट्टीची योजना आखत असाल किंवा मित्रांसोबत सहलीला जात असाल, को-ऑर्ड्स प्रत्येक प्रसंगासाठी स्टायलिश लूक देतात. या सेट्सचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा साधा पण आकर्षक लूक कोणत्याही अतिरिक्त प्रयत्नाशिवाय ट्रेंडी आणि स्मार्ट दिसतो. हे को-ऑर्ड सेट्स फॅशन आणि फंक्शनचे परिपूर्ण मिश्रण आहेत. ते कोणत्याही कॅज्युअल पार्टीसाठी परिपूर्ण आहेत. हलक्या वजनाच्या, श्वास घेण्यायोग्य फॅब्रिकमध्ये बनवलेले, हे पोशाख उन्हाळ्याच्या आणि प्रवासाच्या लक्षात घेऊन डिझाइन केलेले आहेत. म्हणून, तुमच्या पुढील सुट्टीचे नियोजन करताना, हे सेट्स तुमच्या पॅकिंग लिस्टमध्ये नक्कीच असले पाहिजेत.

या को-ऑर्ड सेटमध्ये प्रिंटेड, आरामदायी स्वेटशर्ट आणि जॉगर्स समाविष्ट आहेत. ते घालण्यास खूप आरामदायक आहे आणि कोणत्याही बाहेर जाण्यासाठी घालता येते. काळ्या रंगाच्या प्रेमींसाठी, हा स्ट्रीट-कूल, आरामदायी प्रिंटेड टी-शर्ट आणि शॉर्ट्स को-ऑर्ड सेट एक उत्तम पर्याय आहे. मऊ कापडापासून बनवलेला, तो घालण्यास खूप आरामदायी आणि स्टायलिश आहे. हा को-ऑर्ड सेट जिम किंवा मॉर्निंग वॉकसाठी एक उत्तम पर्याय आहे. यात आकर्षक प्रिंट आहेत जे तुमची शैली वाढवतात आणि तुम्हाला एक छान लूक देतात.

## उती संवर्धनातील संधी

कारकिर्द



उती अभियांत्रिकी (टिश्यू इंजिनिअरिंग) हे शरीरातील खराब झालेल्या उतींच्या जागी नवीन उती तयार करण्याचे आणि त्यांचे उत्पादन करण्याचे शास्त्र आहे. उती अभियांत्रिकी हे संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाचे एक उदयोन्मुख आंतरविद्याशाखीय क्षेत्र आहे. त्यामध्ये आरोग्य सेवा उपचारांच्या पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणण्याची आणि जगभरातील लाखो लोकांच्या आरोग्याची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारण्याची क्षमता आहे.

उती अभियांत्रिकी पेशी जीवशास्त्र, पदार्थ विज्ञान आणि बायोमेडिकल अभियांत्रिकीच्या घटकांना एकत्र करते आणि त्याद्वारे उतींची पुनरुत्पत्ती केली जाते. उती अभियांत्रिकीसाठी मुख्य घटक म्हणजे स्टेम पेशी, त्यांचे विभाजन नियंत्रित करणारे मॉर्फोजेन्स किंवा वाढीचे घटक आणि बाह्यपेशीय मॅट्रिक्सचा एक साचा, जो त्यांच्या वाढीसाठी सूक्ष्म वातावरण तयार करतो. उती अभियांत्रिकी हे पुनरुत्पादक औषध (रिजनरेटिव्ह मेडिसिन) या व्यापक क्षेत्राचाच एक भाग आहे.

बायोमटेरिअल विज्ञान, संगणक विज्ञान आणि स्टेम पेशी व जनुकीय तंत्रज्ञानातील जलद विकासामुळे उती अभियांत्रिकीला गती मिळाली आहे. प्लुरिपोटेंट स्टेम पेशींचा शोध, जनुकीय सुधारणा आणि अवयवांचे थ्रीडी बायो-प्रिंटिंग यांसारख्या नवकल्पना उती अभियांत्रिकी क्षेत्रात राबवल्या जात आहेत, मात्र अद्यापही कृत्रिम उतींचा वापर करण्यातील यश मर्यादित राहिले आहे. बहुविद्याशाखीय संशोधन आणि आंतरविद्याशाखीय सहभागामुळे उती अभियांत्रिकी आणि औषधांतील भविष्यातील विकासाचा मार्ग मोकळा करेल.

**आव्हाने**

आजकाल एखादा अवयव किंवा उती गमावणे हे मानवाच्या आरोग्यातील मोठे आव्हान आहे. उती/अवयव प्रत्यारोपण, शस्त्रक्रिया किंवा यांत्रिक उपकरणांचा वापर हे सामान्य उपचार आहेत. सध्याच्या धोरणांच्या मर्यादांमुळे उती अभियांत्रिकीमधील आवड वाढली आहे. पेशी प्रकार, सुधारणा आणि योग्य आधारभूत मॅट्रिक्स हे उती अभियांत्रिकीचे तीन मुख्य आधार आहेत. महत्त्वपूर्ण संशोधन, प्रगती आणि पेशी जीवशास्त्र, पेशी यांत्रिकी आणि बायोमटेरिअल्समधील अद्ययावत गोष्टींनंतरही खरोखर कार्यक्षम उती विकसित करण्याच्या आव्हानांना पेलू शकतील अशी फारच कमी उत्पादने समोर आली आहेत.


'नॅनोटेक्नॉलॉजी' नवीन सामग्री तयार करते. ती पुढील उती-अभियांत्रिकी प्रयोगांना सक्षम करू शकते. या संदर्भात नॅनोटेक्नॉलॉजी आणि नॅनोमटेरियल्सचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी उती अभियांत्रिकी हे संशोधनाचे महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. हृदय व रक्तवाहिन्या प्रणालीतील प्रयोगांमध्ये कार्डियाक पॅचेस, रक्तवाहिन्यांचे जाळे आणि हृदयाच्या झडपा यांचा समावेश आहे. 'बायोआर्टिफिशियल टिश्यू इंजिनिअरिंग' हे गेल्या काही दशकांतील महत्त्वाचे आव्हान आहे.

**व्यावसायिक संधी**

उती अभियांत्रिकी संशोधनामध्ये जीवशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि बायोमेडिकल, केमिकल, मकॅनिकल यांसारख्या विविध अभियांत्रिकी शाखांमधील तज्ज्ञांची आवश्यकता असते. त्यामुळे कार्यात्मक उती तयार करण्यासाठी पेशी व इतर घटकांचे एकत्रीकरण करणे सोपे होते. ज्या व्यावसायिकांकडे एम. एस्सी., एम. टेक., पीएचडी यांसारख्या पदव्या आहेत आणि आरोग्य समस्यांवर पुनरुत्पादक उपायांवर लक्ष केंद्रित करणारी संशोधन कौशल्ये आहेत, ते या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात.

## असा टिकवा फिटनेस

फिटनेस फंडा



अनेकजण नियमित व्यायाम करतात. शक्यतो जीम टाळत नाहीत. मात्र आजारपण, प्रवास किंवा इतर कामांमुळे अधूनमधून व्यायाम चुकतो. कितीही प्रयत्न केला तरी ३६५ दिवस व्यायाम करणं शक्य नसतं. मात्र आठवड्यातले एखाद-दोन दिवस व्यायाम चुकला तरी अनेकांना खूप वाईट वाटतं. आपलं वजन वाढेल की काय, सगळी मेहनत पाण्यात जाईल की काय असे विचार मनात येतात. पण अधूनमधून व्यायाम चुकवल्यामुळे शरीर बेढब होत नसतं हे लक्षात घ्यायला हवं.

तुम्ही तीव्र स्वरुपाचा व्यायाम करत असाल तर एखाद-दुसरा दिवस जीमला जाता आलं नाही तरी काळजी करू नका. ही विश्रांतीसुद्धा चांगली असते हे लक्षात ठेवा. एखाद्या दिवशी व्यायाम न केल्यामुळे तुमचं वजन वाढणार नाही. एखाद्या दिवसाची विश्रांती स्नायूंना आराम मिळवून देते. शिवाय त्यांची झीज भरून काढायलाही मदत होते. अर्थात कारणाशिवाय व्यायाम चुकवू नका.

व्यायाम थांबवल्यानंतर लगेच वजन वाढत नाही. तुम्ही नियमित व्यायाम करत असाल आणि आठवड्यातले पाच ते सहा दिवस जीमला जात असाल तर लगेच वजन वाढणार नाही. अगदी आठवडाभर ब्रेक घेतला तरी काळजी करण्याचं कारण नाही. तुम्ही तंदुरुस्तीची पातळी पुन्हा गाठू शकता.

विश्रांतीच्या काळात तीव्र स्वरुपाचा व्यायाम करणं शक्य नसेल किंवा जीमची सुविधा उपलब्ध नसेल तर चालणं, धावणं, दोरीच्या उड्या मारणं असे व्यायाम करून तुम्ही तुमचा फिटनेस टिकवून ठेवू शकता.

# बेपत्ता आरडी एजंटची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १९ :

१८ जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या एका आरडी (आवर्ती ठेव) एजंटची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली.

राजेंद्र नामदेवराव तंगडपल्लीवार (४९) असे मृताचे नाव असून, त्यांचा मृतदेह सिरोंचा मार्गावरील नागमाता मंदिराजवळ रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण आलापल्ली परिसरात खळबळ उडाली आहे.

राजेंद्र तंगडपल्लीवार हे आलापल्ली येथील प्रगती पतसंस्थेत पैसे जमा करण्याचे काम करायचे. १८ जानेवारी रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे घराबाहेर पडले होते. मात्र, दुपारनंतर त्यांचा भ्रमणध्वनी बंद असल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. सर्वत्र शोध घेऊनही पत्ता न लागल्याने



अखेर अहेरी पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवण्यात आली होती. सोमवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास नागमाता मंदिराजवळ एक मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळी धाव घेतली असता तो मृतदेह राजेंद्र यांचाच असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक तपासानुसार, अज्ञात मारेकऱ्यांनी राजेंद्र यांच्या डोक्यावर आणि हातावर धारदार शस्त्राने गंभीर वार केले आहेत. विशेष म्हणजे, राजेंद्र यांची दुचाकी, भ्रमणध्वनी आणि बँकेची पैसे जमा करण्याची मशीन घटनास्थळावरून गायब आहे. यावरून हा खून लुटमारीच्या उद्देशाने झाला असावा, असा संशय पोलिसांना आहे.

उपअधीक्षक अजय कोकाटे आणि पोलीस निरीक्षक हर्षल एकरे यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी ठसेतज्ज्ञ आणि न्यायवैद्यक शास्त्र (फॉरेन्सिक) पथकाला पाचारण केले असून परिसरातील पुरावे संकलित केले जात आहेत. अज्ञात आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांची दोन पथके रवाना करण्यात आली आहेत. भरदिवसा घडलेल्या या थरारामुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## शेतकऱ्याची मुलगी मैत्रेयी जमदाडे उपराजधानीत शहरात सहाय्यक आयुक्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :



मैत्रेयी अविनाश जमदाडे यांची नागपूर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त (प्रथम श्रेणी अधिकारी) म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांचे कष्ट, जिद्द आणि सातत्याची ही पावती असल्याची भावना समाज माध्यमांवर व्यक्त केली जात आहे.

आई-वडिलांचे अध्यात्मिक विचार, शिस्त आणि योग्य संस्कार यांचा प्रभाव तिच्या यशात स्पष्टपणे दिसून येतो. शेतकरी कुटूंबातील मैत्रेयी यांनी मिळवलेल्या यशासाठी त्यांच्यावर कौतूकाचा वर्षाव होत आहे. मैत्रेयी यांच्या या घवघवीत यशामुळे कुटुंबासह सर्व मित्रपरिवार आणि समाजाचा अभिमान वाढला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामध्ये त्यांचे गाव आहे. ग्रामीण भागांमधून येऊन हे यश संपादन केल्याने तिचे यश नक्कीच सर्वांसाठी प्रेरणादायक आहे.

दर्जेदार प्रशिक्षण देण्याचे मोलाचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व? प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर करीत आहे. उत्तम प्रशिक्षणाच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत २०२२-२३ वर्षात घेण्यात आलेल्या इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी (राजपत्रित) पदाच्या अंतिम परीक्षेत महाज्योती संस्थेची मैत्रेयी अविनाश जमदाडे मुलींमध्ये राज्यात प्रथम स्थानी आल्या होत्या.

पुण्यात राहणाऱ्या मैत्रेयी जमदाडे यांनी त्यांच्या प्रवासाविषयी सांगितले होते की, महाज्योती संस्थेच्या योजनांचा लाभ घेण्याची मला संधी मिळाली. विशेष म्हणजे, एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या अधिकारी पदाच्या परीक्षेत मी प्रथम स्थान मिळाले याचा मला आनंद आहे. मला अधिकारी म्हणून या विभागात काम करण्याची संधी मिळत असल्याचा मला अभिमान असल्याचेही मैत्रेयी जमदाडे हिने सांगितले.

महाज्योतीमार्फत मला पुण्यातील नामांकित एच. व्ही. देसाई स्पर्धा प्रशिक्षण केंद्र येथे मोफत मार्गदर्शन मिळाले. तसेच महाज्योतीमार्फत विद्यावेतनातून अभ्यास करण्यास भरीव मदत मला मिळाली. यामुळे मला परीक्षेची तयारी करताना प्रत्येक टप्प्यावर योग्य दिशा मिळाली. एमपीएससी मुख्य परीक्षेत ११९ गुण व मुलाखतीमध्ये ५५ पैकी ३५ गुण (सर्वाधिक) गुण मिळवता आले असेही त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर मैत्रेयी अविनाश जमदाडे यांची नागपूर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त (प्रथम श्रेणी अधिकारी) म्हणून नियुक्ती झाली आहे. शेतकरी कुटूंबातील मुलीने हे यश मिळवल्याने त्यांच्यावर कौतूकाचा वर्षाव होत असून त्यांचा प्रवास तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. राज्यात मुलींमधून पहिल्या येण्याचा मानही त्यांन मिळवला आहे.

## एकत्र यायचे असेल तर सत्तेतून बाहेर पडा
## दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीत मिठाचा खडा?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादीची युती होण्याची शक्यता असताना शरद पवार गटाच्या आमदार उत्तम जानकर यांनी युतीसाठी अजित पवारांपुढे सत्तेतून बाहेर पडण्याची अट ठेवली आहे. यामुळे दोन्ही पक्षांच्यात संभाव्य युतीत मिठाचा खडा पडल्याची चर्चा सुरू झाली आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली होती. पण त्यानंतरही त्यांना दारूण पराभव झाला होता. आता पवार कुटुंब जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतही एकत्र येण्याची शक्यता आहे. त्यासंबंधीची बोलणी त्यांच्या नेतृत्वांत सुरू झाली आहे. पण शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी अजित पवारांपुढे युतीसाठी महायुती सरकारमधून बाहेर पडण्याची अट ठेवल्यामुळे दोन्ही पक्षांची अडचण झाली आहे.

उत्तम जानकर म्हणाले, महापालिका निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा आहे. पण मला याची कोणतीही कल्पना नाही.

ते पुढे म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील असे मला वाटत नाही. कारण, शरद पवारांचा विचार वेगळा आहे आणि आता अजित पवार हे सत्तेसोबत आहेत. त्यामुळे बिर्याणीमध्ये गुळवणी चालेल की नाही? पण शरद पवारांचा वेगळा विचार आहे. तो घेऊन आम्ही पुढे जात आहोत. त्यामुळे अजित पवारांना एकत्र यायचे असेल तर प्रथम त्यांना सत्तेतून बाहेर पडावे लागेल.

## सभागृहात मतदान पण सत्ता ठरते बोर्डरूममध्ये
## खाजगीकरण, टीडीआर- एफएसआय आणि जमिनींचा खेळ
## कार्पोरेटर नाहीत तर कॉर्पोरेट ठरवेल मुंबईचा महापौर !

मुंबईचा पुढचा महापौर कोण होणार? हा प्रश्न आता महापालिकेच्या सभागृहात कमी आणि कॉर्पोरेट बोर्डरूममध्ये अधिक ठरतोय, अशी तीव्र चर्चा शहराच्या राजकारणात पेटली आहे. कागदोपत्री नगरसेवक मतदान करतील; प्रत्यक्षात मात्र पैसा, ठेके, प्रकल्प, टीडीआर-एफएसआय आणि लॉबिंग हेच सत्तेची दिशा ठरवतील, असा आरोप उघडपणे केला जात आहे.

देशातील सर्वात श्रीमंत स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकाकडे हजारो कोटींचं बजेट आहे. रस्तेझपूल, पुनर्विकास, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, मेट्रो, कोस्टल रोड–या प्रत्येक क्षेत्राभोवती कॉर्पोरेट हितसंबंधांची घट्ट जाळी विणली जात आहे. त्यामुळे महापौर कोण? हा प्रश्न कोणत्या कॉर्पोरेटला कोण चालतो? अशा पातळीवर ढकलला जातोय, असा रोखठोक आरोप राजकीय वर्तुळातून होत आहे.



दीपक कैतके
मुंबई.

**सेवांचा खाजगीकरणाकडे झुकलेला काटा**

महापालिकेच्या सेवांच्या खाजगीकरणाचा वेग हेच या खेळाचं केंद्र आहे. शहराची जीवनवाहिनी मानली जाणारी इएरळ प्रवासी वाहतूक, वीज वितरण, पाणीपुरवठा – या सगळ्या क्षेत्रांमध्ये खाजगी कंपन्यांचा वाढता हस्तक्षेप दिसतो आहे. निर्णय सभागृहात घेतले जात असल्याचा दावा केला जातो; मात्र फायली कुठल्या वेगाने सरकतील, कोणत्या कंपनीला कंत्राट मिळेल–हे पडद्याआड ठरवलं जात असल्याची कुजबुज आहे.

**मोक्याच्या जमिनींवर कोणाचा डोळा?**

पुनर्विकासाच्या नावाखाली शहरातील मोक्याच्या भूखंडांवर कॉर्पोरेटचा थेट डोळा असल्याचा आरोप आता अधिक ठळक होतो आहे. धारावीनंतर आता जिजामाता उद्यान, आर्थर रोड कारागृह, एअर इंडिया कॉलनी, कालिना, मुंबई विद्यापीठ (कालिना कॅम्पस)चा परिसर आणि महालक्ष्मी रेसकोर्स–या सगळ्या ठिकाणांच्या टीडीआर व एफएसआयवर बड्या कॉर्पोरेट्सची नजर असल्याची चर्चा आहे. म्हणजेच, जमीन सार्वजनिक; पण लाभ खासगी, असा सरळसोट आरोप.

सभागृहात राजकीय पक्ष शक्तीप्रदर्शन करतात, घोषणांची तोफ डागतात; पण पडद्याआड ठेक्यांचे गणित, स्थायी समितीवरचा ताबा आणि फायलींची गती... याच निकषांवर महापौरपद ठरवलं जात असल्याचं बोललं जातं. नगरसेवकांची मतं औपचारिकता ठरतात आणि निर्णय आधीच सेट.. अशी भावना सामान्य मुंबईकरांच्या मनात घर करतेय.

**लोकप्रतिनिधी की कॉर्पोरेट व्यवस्थापक?**

याच टप्प्यावर प्रश्न उभा राहतो, मुंबईचा महापौर हा लोकप्रतिनिधींचा प्रमुख असणार की कॉर्पोरेट हितसंबंधांचा व्यवस्थापक? पुनर्विकासाच्या नावाखाली विस्थापन, मोठ्या कंपन्यांना सवलती, तर नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्रतीक्षा... हा अनुभव मुंबईकर आधीच घेत आहेत. महापौरपदही जर कॉर्पोरेट पसंतीने ठरणार असेल, तर लोकशाहीचा अर्थ काय उरतो?

राजकीय पक्ष सार्वजनिक मंचावर जनमत, पारदर्शकता, लोकशाही यांची भाषा करतात; प्रत्यक्षात मात्र कॉर्पोरेट लॉबी, सत्तेजवळीक आणि अर्थकारणाचा दबाव हेच निर्णायक ठरत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. त्यामुळे महापौर निवड ही लोकशाही प्रक्रिया उरली आहे की कॉर्पोरेट नियुक्ती,,हा थेट सवाल उभा राहतो.

मुंबईत सत्ता म्हणजे केवळ पद नाही; ती हजारो कोटींच्या निर्णयांची किल्ली आहे. आणि ती किल्ली कुणाच्या हातात जाते, यावरच शहराची दिशा ठरते. म्हणूनच, महापौर कोण होईल यापेक्षा महापौर कोणासाठी काम करेल हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतोय.

एकूणच, येत्या महापौर निवडीकडे पाहताना एक अस्वस्थ सत्य पुढे येतंय–मतदान कार्पोरेटर करतील; पण महापौर कॉर्पोरेट ठरवेल. या लढाईत लोकशाही जिंकते की लॉबी... याचा फैसला पुढील काही दिवसांत होणार असून, त्याचा परिणाम मुंबईच्या भविष्यात खोलवर उमटणार आहे.

## लचक: कारणं, लक्षण आणि उपचार




मनुष्यरूपी शरीर म्हणजे अक्षरशः दोन चाकावर उभी असलेली एक प्रकारची गाडीचं आहे. गाडीचे चाक जसे अचानक पंक्चर होते तसेच आपले दैनंदिन रुटीन जगणे सुरु असतानाच अचानक कधीतरी आपल्या पायात किंवा मानेला किंवा अगदी कमरेत लचक भरते आणि अक्षरशः आपले रुटीन व्यवहार थांबतात.आपल्याला हालचाल करणे देखील कठीण होऊन बसते. आपल्या शरीराच्या विशिष्ट भागात अचानक लचक भरते म्हणजे नेमकं काय होत? अशा प्रकार लचक भरण्याची कारण काय असतात? आणि सर्वात महत्वाचं म्हणजे लचक भरलेली असेल तर त्यावर उपचार काय करायचे? याच प्रश्नाची उत्तर मिळविण्यासाठी अस्थिविकार तज्ज्ञ डॉ. अमेय गोगटे यांच्याशी बातचीत.

**लचक भरणे म्हणजे नेमकं काय?**

■ शरीराच्या विशिष्ट भागात लचक भरते म्हणजे हि अशी स्थिती असते कि जिथे लिगामेंट जे शरीरातील हाडांना एकमेकांसोबत जोडतात,ते शारीरिक क्रियेदरम्यान जास्त ताणले जातात किंवा फाटतात. सर्वसामान्यपणे हे आपल्या टाचेवर परिणाम करतात. परंतु हे हाताच्या, पायाच्या किंवा मान आणि कमरेच्या लिगामेंट मध्ये सुद्धा होऊ शकते. थोडक्यात सांध्यांमध्ये अचानक पणे ताण येणे म्हणजे लचक भरणे होय.

**लचक भरण्याची कारण काय असतात?**

■ अस्थिबंधनावर म्हणजेच लिगामेंट्स वर अनावश्यक अत्याधिक ताण,सांध्यांना विस्थापित करू शकतो.

यामुळे सांधे ताणले जाऊ शकतात. किंवा त्यामुळे सांध्यांचे नुकसान होऊ शकते. चालताना शरीराचा अयोग्य ढब,किंवा प्रमाचा पेक्षा जास्त वजन उचलणे, चुकीच्या पद्धतिने केलेला व्यायाम, धावताना किंवा खाली पडल्यामुळे टाच मुरगाळून लचक भरू शकते. कमरेत किंवा मानेत चुकीचा व्यायाम केला तरी लचक भरते.

**लचक भरल्याची नेमकी लक्षण काय सांगता येतील?**

■ शरीराच्या ज्या भागात लचक भरलेली असते तिथे सूज येते. प्रचंड वेदना होतात. ज्या भागात लचक भरलेली असते त्या भागाची हालचाल करणे देखील कठीण होऊन बसते. त्या भागात जखम होते. लचक भरलेला भाग हा नाजूक वाटू लागतो आणि चालण्यात देखील मुश्किल होते सर्वसाधारण पणे लचक भरण्याची हि लक्षण असतात.

**लचक भरली तर उपचार काय आहेत?**

■ डॉक्टर रुग्णांना लचक भरण्याची कारण विचारून मुख्य निदान करतात. डॉकटर लचक भरलेल्या जागेची काही चाचण्या करून तपासणी करून निदान करतात. अनेकदा एक्सरे करून लचक भरण्याची कारणमीमांसा केली जाते. अनेकदा जर लचक सौम्य असेल तर केवळ बर्फाने किंवा गरम पाण्याने शेक किंवा दाब देण्याचा सल्ला दिला जातो.

आईस पॅक चा वापर करून सूज कमी करता येते. गरज असेल तर मालिश देखील करू शकता. लचक अगदीच गंभीर स्वरूपाची असेल तर औषध घेऊन किंवा शस्त्रक्रिया देखील करून घालवता येऊ शकते.

■ ■ ■

## पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १९ :

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा यांच्या वतीने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन गुरुवार 22 जानेवारी रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मलकापूर रोड, बुलढाणा येथे करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यामध्ये सहयोग को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी व दास गॅस इक्विपमेंट या नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. सदर कार्यालयाकडे नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेवून त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## लिव्हलाँग ३६५ आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्सची आरोग्य साथी रायडरसाठी हातमिळवणी




लिव्हलाँग ३६५ आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्सने प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेमध्ये एक नाविन्यपूर्ण उपाययोजना सुरू करण्यासाठी धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. आरोग्य साथी रायडर हा रायडर प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी, कॅशलेस बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) फायदे आणि जनरल प्रॅक्टिशनर (जीपी) यांच्या सल्लामसलतीचा संगम साधतो, ज्यामुळे दीर्घकालीन संरक्षण आणि दैनंदिन काळजी यांचा समन्वय साधला जातो.हा रायडर सिंगल-प्रीमियम आधारावर दिला जातो, ज्यासाठी एका वर्षाच्या पॉलिसी कालावधीसाठी संरक्षणाकरिता एकदाच प्रीमियम भरावा लागतो. ही नवीन योजना लिव्हलाँग ३६५ च्या दैनंदिन आरोग्य सेवेची उपलब्धता सुलभ करण्याच्या आणि प्रतिबंधात्मक काळजी हा लोकांच्या जीवनाचा एक नैसर्गिक भाग बनवण्याच्या दीर्घकालीन ध्येयाशी सुसंगत आहे. टियर-२ आणि टियर-३ शहरांवर विशेष लक्ष केंद्रित करून, लिव्हलाँग ३६५ संपूर्ण भारतातील एका मजबूत वितरण नेटवर्कद्वारे सुमारे ३५० दशलक्षाहून अधिक ग्राहकांना सेवा देते.

त्याच्या तंत्रज्ञान-आधारित प्लॅटफॉर्म, उच्च ग्राहक समाधान आणि मजबूत डेटा सुरक्षा प्रणालींनी मोठ्या प्रमाणावर विश्वास निर्माण करण्यास मदत केली आहे या क्षमता आता श्रीराम लाइफ इन्शुरन्सच्या ग्राहकांना सातत्यपूर्ण, उच्च-गुणवत्तेच्या आरोग्य सहाय्याने सक्षम करतील.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## ओळख वैद्यक उपकरणांची ग्लुकोमीटर




दीर्घकाळात मधुमेहाच्या गुंतागुंत कमी करण्यासाठी आणि उच्च व कमी रक्तातील साखरेच्या पातळीच्या अप्रिय लक्षणांपासून वाचण्यासाठी तुमच्या रक्तातील ग्लुकोजच्या पातळीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. ग्लुकोमीटरद्वारे रक्तातील साखरेचे निरीक्षण करणे आवश्यक आहे, कारण तुम्ही दर चार ते सहा महिन्यांनी चाचण्या करता. त्याचे निकाल सरासरीच्या स्वरूपात येतात.

तथापि, तरीही तुमच्या रक्तातील साखरेची पातळी जास्त किंवा कमी असू शकते. ग्लुकोमीटर उपकरण, ज्याला ग्लुकोज मीटर असेही म्हणतात, हे एक लहान पोर्टेबल उपकरण आहे जे तुम्हाला तुमच्या सोयीनुसार तुमच्या रक्तातील ग्लुकोजच्या पातळीवर लक्ष ठेवण्याची परवानगी देते. तुम्हाला टाइप-१ किंवा टाइप-२ मधुमेह असल्यास ग्लुकोमीटर योग्य माहिती देईल. मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी, ग्लुकोमीटर नियमितपणे ग्लुकोजची पातळी नियंत्रित करण्यास आणि व्यवस्थापित करण्यास मदत करते.

काही ग्लुकोज मीटर अतिरिक्त वैशिष्ट्यांसह येतात, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे. डेटा स्टोरेज किंवा अतिरिक्त मेमरी.,ज्या लोकांना दृष्टीदोष आहे, त्यांच्यासाठी काही उपकरणे ऑडिओ क्षमतेसह येतात.बॅकलिट स्क्रीनमुळे तुम्ही कमी प्रकाशातही रीडिंग पाहू शकता.काही उपकरणे प्री-लोडेड टेस्ट स्ट्रिप्ससह येतात. ज्या लोकांना हाताळायला अवघड वाटते त्यांच्यासाठी हे उपयुक्त आहे.काही उपकरणांमध्ये थेट तुमच्या लॅपटॉप किंवा संगणकावर माहिती लोड करण्यासाठी USB पोर्ट देखील असतात. ग्लुकोमीटरने तणाव आणि व्यायामामुळे तुमच्या शरीरातील ग्लुकोजच्या पातळीवर कसा परिणाम होतो याचे निरीक्षण करता येते. शरीरातील रक्तातील साखरेच्या पातळीवर लक्ष ठेवणे आणि ती नियंत्रित करता येते. तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढवू शकणाऱ्या संबंधित समस्या ओळखण्याचा प्रयत्न करता येतो.

■ ■ ■

## भैय्यासाहेबांसारखे अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळे




■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १९ :

भैय्यासाहेब देशमुख यांच्यासारखे निःस्पृह, संयमी, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकीय क्षेत्रात विरळा आहेत. सध्या राजकीय वातावरण बदलले असून, समाजात एकूणच राजकीय चारित्र्याची पुनर्बांधणी आवश्यक आहे, असे प्रतिपादन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे केले.

ज्येष्ठ नेते भैय्यासाहेब देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सोहळा देऊळगाव साकरशा येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. दत्तात्रय पाचपवार गुरुजी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी खासदार अनंतराव देशमुख, माजी आमदार संजय रायमुलकर, काँग्रेस नेते श्याम उमाळकर यांच्यासह सर्वपक्षीय नेते, अनेक मान्यवर उपस्थित होते.

सपकाळ म्हणाले की, भैय्यासाहेबांचे समाजासाठी मोठे योगदान असून, राजकारणातही त्यांची प्रगल्भ, विवेकी भूमिका राहिली. त्यांच्या सर्वमान्य नेतृत्वामुळे आशाताई जिल्हा परिषदेत बिनविरोध निवडून आल्या. आज अशी व्यक्तिमत्व राजकारणात दुर्मिळ आहेत.

रायमुलकर म्हणाले की, भैय्यासाहेबांनी कुणाविषयीही कटुता न बाळगता सर्वांशी जिव्हाळा जपला. त्यांचे नेतृत्व पक्षातीत राहिले. उमाळकर म्हणाले की, भैय्यासाहेबांनी नागरिकांच्या हिताची अनेक कामे केली. उतावळी नदीला महापूरावेळी त्यांनी तत्काळ लक्ष वेधल्याने मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा दौरा होऊन आपदग्रस्ताना वेळेत मदत मिळू शकली.

यावेळी देशमुख यांची ग्रंथतुला, विनामूल्य अभ्यासिका भूमीपूजन व ७५ वृक्ष लागवड करण्यात आली. गजानन तात्या कृपाळ, चांद शेख यांनीही मनोगत व्यक्त केले.

मेहकरचे नगराध्यक्ष किशोर गारोळे, माजी नगराध्यक्ष कासम गवळी, काँग्रेस उपाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे, राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष अलीमभाई ताहेर, अनंतराव वानखेडे, माजी कृषी सभापती केशवराव जागृत, गजानन तात्या कृपाळ, श्रीकृष्ण देवकर, ॲड. सुरेश वानखेडे, महाबीजचे संचालक वल्लभराव देशमुख, संपतराव बापू देशमुख, जानेफळचे सरपंच गजाननराव वडनकर, मोहन धोटे, मेहकर सुरेश तात्या वाळूकर, लिंबा पांडव, काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रदीप देशमुख, नंदूभाऊ बोरे, वसंतराव देशमुख, डिगांबर मवाळ, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष भास्करराव ठाकरे, चित्रांगण खंडारे, प्रमोद देशमुख, राहुल देशमुख, संतोषराव नरवाडे, देवानंद पवार, डॉ. शेषराव ब्रदर, डॉ. हेमराज राठी, डॉ. भरत आल्हाट, विनायक टाले, शैलेश सावजी, सुधाकरराव धाबे, विष्णू पाखरे, अभिमन्यू नवले, केशवराव फुके, संतोषराव तोंडे, संदिप कऱ्हाळे, सोशल मीडिया काँग्रेस अध्यक्ष संदिप ढोरे, रूपेश ढोरे यांच्यासह तालुक्यातील विविध समाजांतील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.